१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• मुंबई, शनिवार ११ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३७, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 37 Marathi - Daily - Mumbai, 11 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

नाशिक IT हबमध्ये धर्मांतर आणि महिला शोषणाचा गंभीर प्रकार!

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

## थोडक्यात...

### सुनेत्रा पवारांच्या प्रचाराला रविवारपासून सुरुवात

**बारामती** - बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार



आहे. त्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार रविवार १२ एप्रिलपासून प्रचाराला सुरुवात करणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीमध्येच सुनेत्रा पवार या प्रचाराचा शुभारंभ करणार असल्याची माहिती आहे.

### महिला, तरुणांना ३ हजार बंगालसाठी भाजपाचा जाहीरनामा

**चेन्नई** - भाजपाने आज पश्चिम बंगाल निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. यामध्ये महिला आणि तरुण बेरोजगारांना दरमहा ३,००० रुपये मदत, पहिल्या ६ महिन्यांत समान नागरी संहिता लागू करणे आणि सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ४५ दिवसांत सातवा वेतन



आयोग लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीरनामा प्रसिद्ध करताना सांगितले की, गेली १५ वर्षे बंगालच्या लोकांसाठी दुस्वप्नासारखी होती. ममता घुसखोरांच्या माध्यमातून तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्या आहेत. आम्ही घुसखोरांना शोधून काढू, त्यांना संपवू आणि हद्दपार करू. मोदी सरकार प्रयत्न करत आहे, पण बंगाल सरकार सीमेवर कुंपणासाठी जमीन देत नाही. आम्ही नद्या आणि ओढ्यांवर गस्त घालण्याची व्यवस्था करू.

### लक्ष्मी कंपनीविरोधात आंदोलन तीव्र! उद्या बैठक

**रत्नागिरी** - लोटे येथील लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीकडून पीफाससारखे घातक व विषारी रसायन तयार केले जात असल्याच्या निषेधार्थ स्थानिक नागरिकांचे धरणे आंदोलन मागील ८० दिवसांपासून सुरू आहे. २१ जानेवारीपासून कंपनीच्या गेटसमोर सुरू असलेले हे आंदोलन दिवसेंदिवस अधिक तीव्र बनत आहे. आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी उद्या बैठक आयोजित करण्यात आली आहे. ६ एप्रिल रोजी कोकण नागरी संघर्ष समिती, लोटे पंचक्रोशी पर्यावरण समिती, भोई समाज संघटना तसेच विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून भव्य मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी कंपनी बंद करण्याचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला.


### शेअर बाजारात तेजी सेन्सेक्स ७७ हजार पार

**मुंबई** - शेअर बाजारात आज कामकाजाच्या शेवटच्या दिवशी प्रचंड तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स तब्बल ९१८.६० अंकांच्या वाढीसह ७७,५५०.२५ अंकावर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १.१६ टक्क्यांच्या वाढीसह २४,०५०.६० अंकांवर स्थिरावला. आजच्या तेजीमुळे गुंतवणुकदारांच्या संपत्तीत सुमारे ५ लाख कोटी रुपयांची भर पडली. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली घट आणि डॉलरच्या तुलनेत रुपया मजबूत झाल्यामुळे आज बाजारात तेजी दिसली.

# उबाठा महिनाभरात फुटणार? 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा

## एकनाथ शिंदे पुन्हा दरे गावी पोहोचले! आठ नावांची यादी तयार

■ मुंबई



**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अचानक दोन दिवसांसाठी त्यांच्या साताऱ्यातील दरे गावी गेल्याने ऑपरेशन टायगरच्या चर्चेला उधाण आले आहे. उबाठाचे ८ खासदार महिनाभरात फोडून उबाठात भूकंप घडविण्याची तयारी झाली आहे. महिनाभरात हा बॉम्ब फुटणार आहे. मोठी राजकीय घडामोड होणार असते तेव्हा एकनाथ शिंदे दरे गावी जातात, तिथून दिल्लीला जातात आणि मग मुंबईला परततात. यावेळी ते गावी गेल्याने ऑपरेशन टायगरची यादी तयार झाल्याचे म्हटले जाते.**



**बुधवारी** रात्री एकनाथ शिंदे यांची उबाठाच्या आठ खासदारांसह गुप्त बैठक झाली. या बैठकीला उपस्थित खासदारांची नावे फिरू लागली. त्यात खासदार अरविंद सावंत यांचे नाव असल्याने ते भडकले आणि त्यांनी आज जाहीर निवेदन दिले. त्यांच्या या निवेदनामुळे या फुटीची चर्चा थांबविण्याऐवजी उफाळून आली. त्यात शिंदे यांचे खास मर्जीतील नेते शिरसाट यांनी ऑपरेशन टायगर महिनाभरात होईल, उबाठात स्फोट होईल असे म्हटल्याने राजकारण पेटले. त्यानंतर स्वतः एकनाथ शिंदे, पुत्र श्रीकांत शिंदे यांनी फोडाफोडी होणार नाही असे स्पष्ट सांगितले. पण आता संशयाचे वातावरण गडद झाले आहे.

ऑपरेशन टायगरमध्ये नाव घेतल्याने संतप्त झालेले उबाठाचे खासदार अरविंद सावंत यांनी दिल्लीत माध्यमांसमोर अत्यंत आक्रमकपणे आपली भूमिका मांडली. मी निष्ठावंत शिवसैनिक आहे. पैशाने विकली जाणारी औलाद नाही, असे ठणकावत मी शिंदेंच्या संपर्कात असल्याचा तुमच्याकडे काही पुरावा असेल तर समोर आणा, असे आव्हान दिले.

अरविंद सावंत म्हणाले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मला बरेच काही दिले. उद्धव ठाकरे यांनीदेखील मला मी आज जिथे आहे तिथे पोहोचण्यास मदत केली. मी कदापि त्यांची साथ सोडणार नाही. जगेन तर उबाठासाठी आणि मरेन तेही उबाठासाठी, हा माझा शब्द आहे. मी हे तुम्हाला कोऱ्या स्टॅम्प पेपरवर लिहून द्यायला तयार आहे. मला उभा चिरलात तरी मी मातोश्रीशी प्रतारणा करणार नाही. शिवसेना पक्ष कोणाचा आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह कोणाचे याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात २४ एप्रिल रोजी होणार आहे. त्यामुळेच असल्या बातम्या पेरल्या जात आहेत. मूळ शिवसेनेत आता कोणीही शिल्लक नाही, असे न्यायालयाला भासवण्यासाठी हे षड्यंत्र रचले जात आहे.

सावंत यांच्या या प्रतिक्रियेनंतर शिंदेसेनेचे नेते आमदार संजय शिरसाट, उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत, प्रताप सरनाईक, खासदार श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी यावर प्रतिक्रिया दिल्या. शिंदे गटाचेच संजय शिरसाट यांनी ऑपरेशन टायगरबाबतचे वृत्त खरे आहे, असे सांगत आगीत तेल ओतण्याचे काम केले. ते म्हणाले की, ठाकरेंचे आमदार-खासदार, पदाधिकारी दररोज शिंदेंकडे येतात. शिंदेंसोबत येण्याची इच्छा व्यक्त करतात. ऑपरेशन टायगरची संपूर्ण तयारी झाली आहे. अशा गोष्टी बँडबाजा वाजवत केल्या जात नाहीत. महिन्याभरात उबाठात मोठा राजकीय स्फोट होईल.

त्यावर पलटवार करीत संजय राऊत यांनी म्हटले की, एकनाथ शिंदे उबाठाचे ऑपरेशन टायगर वगैरे करणार हे सर्व साफ झूठ आहे. प्रत्यक्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारंवार ऑपरेशन करून शिंदे गटाची डेड बॉडी बनवली आहे. आता त्या डेड बॉडीवर फडणवीस पुन्हा ऑपरेशन करणार आहेत. आमचे नऊच्या नऊ खासदार एकत्र आहेत आणि एकत्र राहतील.

वडेट्टीवार यांनी भाजपाच्या फोडाफोडीच्या राजकारणावर टीका केली. ते म्हणाले की, राजकारणात आजकाल नैतिकता नावाची चीज शिल्लक राहिलेली नाही. भाजपाने फोडाफोडीचा नवा पायंडा पाडला आहे. कोण कोणासोबत आहे आणि कोण कोणाच्या विरोधात आहे हेच कळत नाही. पक्ष आणि नेते फोडणे ही जणू फॅशनच झाली आहे.

### श्रीकांत शिंदेंचा इन्कार

'ऑपरेशन टायगर'वरून हा सारा गदारोळ सुरू असताना शिंदेंचे खासदार पुत्र श्रीकांत शिंदे यांनी मात्र या विषयाची चर्चा बंद व्हावी म्हणून म्हटले की ऑपरेशन टायगर वगैरे काहीही नाही. ठाकरेंच्या खासदारांसोबत कोणतीही बैठक झालेली नाही. या सर्व अफवा आहेत. एकनाथ शिंदे यांनीदेखील माध्यमांसमोर येत ऑपरेशन टायगरचे वृत्त निराधार असल्याचे सांगत चर्चेला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

## राज्यातील बड्या नेत्याची व्हीएसआर विमान कंपनीच्या मालकाशी भेट

■ मुंबई

**व्हीएसआर** विमान कंपनीचा मालक व्ही. के. सिंग याने महाराष्ट्रातील एका बड्या नेत्याची विमानतळावर भेट घेतली. यावेळी दिवंगत अजित पवार यांच्या विमानाच्या मृत पायलटचा मुलगाही उपस्थित होता, असा दावा शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजितदादा अपघात प्रकरण हलक्यात घेऊ नका, व्ही. के. सिंगला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करू नका आणि त्या विमानाने प्रवास करणे टाळा, अन्यथा हे अडचणीचे ठरेल, असा इशाराही रोहित पवार यांनी दिला आहे.




रोहित पवार यांनी आज एका पोस्टमध्ये म्हणाले की, दिल्लीत पत्रकार रजत शर्मा यांच्या मुलीच्या लग्नाच्या रिसेप्शनला गेलेला महाराष्ट्रातला अत्यंत मोठा नेता व्हीएसआयच्या विमानाने परत येतो. प्रायव्हेट चार्टर टर्मिनलवर त्या नेत्याला व्हीएसआयचा मालक व्ही. के. सिंग रिसिव्ह करतो. पान ७ वर

## हिजबुल्लाचा बंदोबस्त करा! अन्यथा हल्ले इस्त्रायलने लेबनॉनला सुनावले! युद्धबंदी अधांतरी

■ तेहरान

**इराण**-अमेरिका युद्धबंदीसाठी अंतिम चर्चेचे प्रयत्न सुरू असताना इस्त्रायलने मात्र लेबनॉनवरील बॉम्बहल्ले सुरूच ठेवले आहेत. हिजबुल्लापासून आपल्या देशाला धोका आहे, त्यामुळे हिजबुल्लाला नष्ट केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. इराणशी युद्धबंदीचा हिजबुल्लाशी काहीही संबंध नाही. लेबनॉनने हिजबुल्लाचा बंदोबस्त करावा. त्यानंतर आम्ही स्वतंत्रपणे लेबनॉनशी शांतता प्रस्थापित करण्यासाठी चर्चा करू, अशी ठाम भूमिका इस्त्रायलने घेतली. इस्त्रायलच्या या भूमिकेमुळे आजपासून पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये सुरू होणार असलेली युद्धबंदीची चर्चा अधांतरी लटकली आहे. पान ७ वर

### अमेरिकेचा महागडा ड्रोन होर्मुजमध्ये गायब झाला

अमेरिकन नौदलाचे सर्वात महागडे एमक्यू-४सी ट्रायडन हे टेहळणी ड्रोन आज होर्मुजच्या सामुद्रधुनीत बेपत्ता झाले. या ड्रोनची किंमत २०० दशलक्ष डॉलर म्हणजे सुमारे १ हजार ८५३ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले. इटलीतील अमेरिकन नौदलाच्या तळावरून निघालेले हे ड्रोन तीन तास होर्मुज परिसरात टेहळणी करून नौदल तळावर परतत होते. त्यादरम्यान ड्रोनमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाला. ड्रोनने तातडीच्या मदतीचा संदेशही पाठवला. मात्र त्यानंतर काही क्षणातच ते बेपत्ता झाले.

## नाशिक लैंगिक अत्याचार भाजपाचे कंपनीसमोर आंदोलन

■ नाशिक

**नाशिक** शहरातील एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत महिलांवरील लैंगिक



शोषण, मानसिक छळ आणि धर्मांतरणासाठी दबाव टाकल्याच्या गंभीर आरोपांमुळे वातावरण तापले असून, आज भाजपा युवा मोर्चाने कंपनीसमोर जोरदार आंदोलन केले. या आंदोलनावेळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत आक्रमक भूमिका घेतली. काही कार्यकर्त्यांनी कंपनीत आत घुसण्याचाही प्रयत्न केला. पोलिसांनी हस्तक्षेप करत काही कार्यकर्त्यांना पान ७ वर

## अशोक खरातच्या पत्नीच्या अटकपूर्व जामिनावर १६ एप्रिलला सुनावणी

■ नाशिक

**भोंदू**बाबा अशोक खरातची फरार असलेली पत्नी कल्पना खरातच्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज राहता न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी कल्पना खरातांच्या वकिलांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितल्याने सुनावणी १६ एप्रिलपर्यंत तहकूब केली.

३१ मार्च रोजी शिर्डी पोलीस ठाण्यात अशोक खरात, कल्पना खरातसह पाच जणांवर आर्थिक फसवणूक आणि सावकारकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत दोन आरोपींना अटक केली असून, ते सध्या १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्हा दाखल झाल्यापासून कल्पना खरात फरार असल्याने शिर्डी पोलिसांनी १ एप्रिल रोजी तिच्याविरुद्ध 'लुक आऊट नोटीस' जारी केली होती. या गुन्ह्यात अटकेत असलेला आरोपी अरविंद बावके याच्या नावाने कल्पना खरातने 'पॉवर ऑफ ॲटर्नी' दिली होती. यावरून आर्थिक व्यवहारांमधील तिचा सहभाग स्पष्ट होतो. दरम्यान, भोंदू अशोक खरात प्रकरणात तपास यंत्रणांनी १६० जीबी इतका डिजिटल डेटा जप्त केला आहे या पुराव्यांमुळे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. फॉरेन्सिक तपास पूर्ण करून हा अहवाल एसआयटीकडे पान ७ वर

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील कर्नल पुरोहित ब्रिगेडियरपदी

■ मुंबई

### ६ महिन्यांत दुसरी बढती



**मालेगाव** बॉम्बस्फोट प्रकरण २००८ मधून निर्दोष मुक्तता झालेल्या कर्नल श्रीकांत पुरोहित यांची ब्रिगेडियर पदावर बढती देण्यात येणार याहे. अवघ्या सहा महिन्यांत त्यांना दुसऱ्यांदा बढती मिळाली आहे. सप्टेंबर २०२५ मध्येच त्यांना कर्नल पदावर बढती मिळाली होती.

कर्नल पुरोहित यांचे नाव २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात आले होते. या प्रकरणात त्यांनी जवळपास ९ वर्षे तुरुंगवास भोगल्यानंतर २०१७ मध्ये जामिनावर सुटका झाली आणि ते पुन्हा सेवेत रुजू झाले. मात्र त्यांच्या बढती व सेवाज्येष्ठतेचा प्रश्न प्रलंबितच होता. दरम्यान, मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केल्यानंतर त्यांनी सशस्त्र बल न्यायाधिकरणाकडे धाव घेतली होती.

## हायकोर्टाचा एमएमआरडीएला दणका रिलायन्सचे ६४६ कोटी परत करण्याचे आदेश

■ मुंबई

**वांद्रे-कुर्ला** संकुलातील (बीकेसी) बांधकाम कालमर्यादेत पूर्ण न केल्याने कामाला दिलेल्या मुदतवाढीचा अतिरिक्त दंड म्हणून रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडकडून १ हजार ११६.८३ रुपये मिळावेत, ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (एमएमआरडीए) मागणी मुंबई उच्च न्यायालयाने नुकतीच फेटाळून लावली. त्याचबरोबर एमएमआरडीएने रिलायन्सकडून याआधी वसूल केलेले ६४६.७७ कोटी रुपये ९० दिवसांत परत करण्याचे आदेश न्यायालयाने एमएमआरडीएला दिले.

रिलायन्सने २००६ मध्ये बीकेसीमध्ये १.१५



लाख चौरस मीटरचा भूखंड एमएमआरडीएकडून भाडेतत्वावर घेतला होता. त्यासाठी रिलायन्सने एमएमआरडीएला १ हजार १०४ कोटी रुपये दिले होते. एमएमआरडीएने हळूहळू बीकेसीतील चटई क्षेत्र निर्देशांकात (एफएसआय) वाढ केली. तेवढ्याच भूखंडावर ३.१२ लाख चौरस मीटर एवढे बांधकाम करण्याचे अधिकार रिलायन्सला प्राप्त झाले. या अतिरिक्त बांधकामासाठी रिलायन्सने एमएमआरडीएला ४,००५ कोटी रुपये भाडे करारानुसार दिले. करारातील अटीनुसार हे संपूर्ण बांधकाम रिलायन्सने चार वर्षांच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक होते.

**भारताची गगनयान मिशनअंतर्गत दुसरी इंटिग्रेटेड एअर ड्रॉप चाचणी यशस्वी झाली आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी याबद्दल भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्त्रो) अभिनंदन केले. ही चाचणी सतिश धवन अंतरिक्ष केंद्रात पार पडली. हा प्रयोग अंतराळवीरांच्या सुरक्षित परतीसाठी असलेल्या पॅराशूट प्रणालीची चाचणी करण्यासाठी होती.**

## 'गगनयान'चा महत्त्वाचा टप्पा पार दुसरी एअर ड्रॉप चाचणी यशस्वी

■ नवी दिल्ली

**भारताच्या** पहिल्या मानव अंतराळ मोहिमेच्या तयारीत हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. डॉ. जितेंद्र सिंह यांनी सांगितले की, इंटिग्रेटेड एअर ड्रॉप टेस्ट यशस्वी झाली आहे. हा गगनयान मिशनमधील अत्यंत महत्त्वाचा आणि तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीचा प्रयोग आहे. या मोहिमेतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे अंतराळवीरांना सुरक्षितपणे पृथ्वीवर परत आणणे. अंतराळवीर परत येताना त्यांचे क्रू मॉड्यूल पृथ्वीच्या वातावरणात अतिशय वेगाने प्रवेश करते. या वेगावर नियंत्रण ठेवणे आणि सुरक्षित लँडिंग करणे अत्यंत आवश्यक असते. यात



पॅराशूट प्रणाली महत्त्वाची भूमिका बजावते. ही प्रणाली पान ७ वर

## कंत्राटदारांचा संप चिघळणार १५ एप्रिलला पुढील निर्णय

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** कंत्राटदारांनी ९६,४०० कोटी रुपयांची थकीत देयके न मिळाल्याने ७ एप्रिलपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. या संपामुळे राज्यातील रस्ते, पूल आणि अनेक महत्त्वाची विकासकामे ठप्प झाली आहेत. तरीही सरकारने याची दखल घेतली नसल्याने हे आंदोलन चिघळण्याची शक्यता आहे. कारण सरकारने तत्काळ बिले न दिल्यास आंदोलनाचे स्वरूप अधिक तीव्र करण्याचा इशारा कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिला आहे. यासंदर्भात १५ एप्रिल रोजी जाहीर पुढील निर्णय घेतला जाणार आहे. मिलिंद भोसले यांनी सांगितले की, राज्यातील सर्व विभागाकडील विकासाची कामे केलेल्या कंत्राटदारांची ९६ हजार कोटींची देयके प्रलंबित आहेत.

## भारताने जागतिक हवामान परिषदेचे यजमानपद सोडले! विरोधकांची टीका

■ मुंबई

**२०२८ मध्ये** होणाऱ्या ३३ व्या कॉन्फरन्स ऑफ पार्टीज या जागतिक हवामान परिषदेचे यजमानपद भारताने अचानक सोडल्यामुळे तीव्र राजकीय वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसचे खासदार जयराम रमेश यांनी केंद्र सरकारच्या हवामानविषयक बांधिलकीवर प्रश्न उपस्थित करत राजकीय संधीसाधूपणाचा आरोप केला आहे. २०२३ मध्ये दुबई येथे झालेल्या हवामान परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा निर्णय घेतला होता. मात्र आता त्यांनी हा निर्णय मागे घेतला आहे. ज्यात भारताने जागतिक हवामान परिषद आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या माघारीचे अधिकृत स्पष्टीकरण न दिल्यामुळे तर्क-वितर्क आणि टीका वाढली आहे.

माजी पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी असा आरोप केला की, ३३ वी कॉन्फरन्स ऑफ पार्टीज ही जागतिक हवामान परिषद भारतात घेण्याचा निर्णय हा हवामान विषयासाठी नव्हे, तर निवडणुकीच्या फायद्यासाठी घेतला गेला होता. त्यांच्या मते, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी सरकारला या मोठ्या कार्यक्रमाचा फायदा घ्यायचा होता. २०२४ च्या निवडणुकीपूर्वी जी-२० परिषदेचा असाच वापर केला गेला. आता भारताने ही पान ७ वर

**त्या दिवशी कोर्टात पाय ठेवताना मला जाणवलं- आज केस नाही खेळ सुरू होणार आहे. समोर CBI त्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास. माझ्या बाजूला बसलेला आरोपी-एकदम शांत जणू त्याला आधीच माहित आहे, त्याचं आयुष्य आज एका शब्दावर ठरणार आहे.**

# फसलेला ट्रॅप

**ॲड. अमोल मेंढे**



Guilty किंवा Not Guilty. त्याच्यावर आरोप होते-लाच मागितल्याचे.

२५,००० ची मागणी २१,००० स्वीकारले Trap Recovery Chemical test सगळं textbook perfect. पण काहीतरी बरोबर नव्हतं. सरकारी वकील उठले. त्यांचा आवाज तलवारीसारखा-माय लॉर्ड, आरोपीने २५,००० ची मागणी केली २१,००० घेतले आणि आम्ही त्याला रंगेहात पकडलं.

Phenolphthalein testVoice recording Panch witnesses

सगळं विरोधात.....कोर्टात बसलेल्या प्रत्येकाला वाटत होतं- ही केस संपली. पण मला वाटत होतं-

आता सुरू झालीय......मी शांतपणे उठलो. माय लॉर्ड एक साधा प्रश्न आहे-

कशासाठी लाच? कोर्टात शांतता.

मी पुढे म्हणालो-

काम बाकी असेल तरच लाच मागितली जाते पण जर काम आधीच झालं असेल तर? मी फाईल उघडली आणि पहिला crack दाखवला. कंपनीची procedure clear होती-

Bills → Accounts Department Accused → Personal Department (verification role) Bills already Accounts Department ला गेले होते. Payment process सुरू झाली होती. Accused कडे काहीही pending नव्हतं...

हे सगळं रेकॉर्डवर होतं जर कामच बाकी नाही तर लाच कशासाठी? आणि त्या क्षणी सरकारी वकिलांचा चेहरा पहिल्यांदा पडला.

मी informant कडे वळलो. तुमचे किती bills pending होते? तो थांबला अडखळला माहित नाही मी हसलो नाही पण कोर्टाकडे पाहिलं.

Panch witness तुम्ही demand ऐकली का? नाही CBI officer तुम्ही verify केलं का bills pending होते?

माहित नाही, मी हलक्या आवाजात म्हणालो- माय लॉर्ड investigation नाही assumption आहे.

सरकारी वकील शेवटचा प्रयत्न करत होते- Recovery झाली आहे! Chemical test positive आहे!

मी पुढे चालत गेलो कोर्टाच्या मध्यभागी उभा राहिलो. होय माय लॉर्ड पैसे सापडले, पण गुन्हा सापडला का?

कोर्टात शांतता. त्या क्षणी मला जाणवलं- हा केस evidence चा नाही belief चा आहे. जर कोर्टाने prosecution वर विश्वास ठेवला-तर आरोपी संपला. जर doubt निर्माण झाला-तर तो वाचेल.

मी एकेक शब्द टाकत गेलो- Demand नाही
Independent corroboration नाही
Voice recording मध्ये figure नाही. २५,००० demand चा उल्लेखच नाही
Witness unreliable

मग हा trap आहे की trap Mm illusion? माय लॉर्ड prosecution ची संपूर्ण theory ही 'पेंडिंग वर्क' वर आधारित आहे. पण पुरावा सांगतो-काम आधीच झालं आहे.

मी शेवटचा वार केला- माय लॉर्डपडताळणी न करता तपास म्हणजे केवळ कल्पना करण्यासारखे आहे.

जेव्हा सत्य आणि शंका यांच्यात युद्ध होतं तेव्हा कायदा नेहमी शंकेच्या बाजूने उभा राहतो. सर्वोच्च न्यायालयाचे कायदे मी कोर्टात ठेवले-

फक्त जप्ती पुरेशी नाही, तक्रारदाराचे हितसंबंध आहेत. जज माझ्याकडे पाहत होते

आणि मला कळलं-खेळ उलटला आहे.

जजनी चष्मा खाली केला. फाईल बंद केली आणि म्हणाले- मागणीचा पुरावा मिळाला?- नाही

गुन्हा स्वीकार केला ? -नाही, संशयाला वाव नाही? नाही, आरोपी निर्दोष.

त्या एका क्षणीसीबीआयचा ट्रॅप तुटला आणि एक माणूस निर्दोष मोकळा झाला. कोर्टाबाहेर आलो

आरोपी माझ्याकडे पाहत होता, तो काही बोलला नाही.पण त्याच्या डोळ्यांत कृतज्ञता होती-

तुम्ही मला वाचवलं

मी मनात म्हणालो- मी फक्त शंका निर्माण केली, सत्याने तुला वाचवलं. ट्रॅप लावणं सोपं असतं

पण कायद्याच्या कोर्टात टिकवणं-तेवढंच कठीण असतं.

# ठाकरे सेनेचा विरोध धुडकावून 'गारगाई' प्रकल्पाला अखेर मंजुरी



■ मुंबई

**मुंबईकरांची** वाढती पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी पालघर जिल्ह्यातील गारगाई धरण प्रकल्पाला मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीने अखेर मंजुरी दिली आहे.१४ वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पास पर्यावरणाचा मुद्दा पुढे करत ठाकरे सेना व काँग्रेसने हा प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्याची मागणी केली.परंतु बहुमताच्या जोरावर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी ही मागणी फेटाळून लावत प्रस्ताव बहुमताने मंजूर केला.

पालिकेने २०११ मध्ये चितळे कमिटीच्या शिफारसीनुसार,पूर्व वैतरणा नदीवर गारगाई, पिंजाळ पाणीपुरवठा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला होता. परंत अनेक तांत्रिक अडचणी व पालिका प्रशासनाची उदासीनता यामुळे यापैकी एकही प्रकल्प सत्यात उतरला नाही. अखेर राज्यातील सत्ताधारी भाजपा-शिवसेना महायुतीच्या निर्देशानुसार महापालिकेने गारगाई प्रकल्पाचे काम हाती घेण्याचा निर्णय घेतला. तसा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर केला होता.पण या प्रकल्पासाठी करण्यात येणारा खर्च जास्त असून प्रकल्प साकारताना पर्यावरणाचीही काळजी घेण्यात आली नसल्याचा आक्षेप शिवसेना ठाकरे गटासह काँग्रेसने घेतला. प्रस्ताव दप्तरी दाखल करून नव्याने सादर करावा अशी मागणी करण्यात आली. मात्र, मुंबईतील पाण्याचा तुटवडा लक्षात घेता प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक असल्याचे सभागह नेते गणेश खणकर यांनी स्पष्ट केले.अखेर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी दप्तरी टाकण्याची सूचना मतास टाकली असता ती बहुमताच्या जोरावर फेटाळून लावली. त्यानंतर मूळ प्रस्ताव मतास टाकला असता तो बहुमताने मंजूर करण्यात आला.

# शिक्रापुरात मोकाट कुत्र्यांचा ११ वर्षीय मुलीवर हल्ला

■ शिरुर

**तालुक्यातील** शिक्रापूर गावात एका ११ वर्षीय शाळकरी बालिकेवर कुत्र्यांच्या टोळक्याने हल्ला केल्याची घटना घडली आहे.

अंजली गोपाल राठोड असे या जखमी बालिकेचे नाव असून ती गावातील पाबळ चौक परिसरातील रहिवासी आहे. मोकाट कुत्र्यांनी अंजलीच्या शरीराचे लचके तोडल्याने ती गंभीर जखमी झाली असून तिच्यावर पुण्याच्या ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# कोकण रेल्वे मार्गावर धावणार चार वातानुकूलित विशेष गाड्या



■ मुंबई

**उन्हाळी** सुट्ट्यांमधील प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने कोकण मार्गावर मुंबई - मडगाव दरम्यान ४ विशेष वातानुकूलित गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या दादर, ठाणे, पनवेल, रोहा, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ आणि थिविमसारख्या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबतील.

रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ०११२९ मुंबई सीएसएमटी-मडगाव स्पेशल आज शुक्रवार १० एप्रिल आणि मंगळवार १४ एप्रिल रोजी मुंबईहून मध्यरात्री ०.२० वाजता सुटेल. ही गाडी त्याच दिवशी दुपारी १५.१५ वाजता मडगावला पोहोचेल.

परतीच्या प्रवासासाठी गाडी क्रमांक ०११३० मडगाव मुंबई सीएसएमटी स्पेशल १० एप्रिल आणि १४ एप्रिल रोजी मडगावहून सायंकाळी १६०० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०३.४५ वाजता मुंबईत पोहोचेल. प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी या विशेष फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. तरी प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# यंदा नदी, तलाव आटणार सर्वत्र उष्णतेच्या लाटा येणार

**हालसिद्धनाथ देवाच्या यात्रेतील भाकणूक**

■ बेळगाव

**जिल्ह्यातील** चिकोडी तालुक्यातील नणदी येथील ग्रामदैवत श्री हालसिद्धनाथ देवाची यात्रा उत्साहात पार पडली. यावेळी सचिन पुजारी व कृष्णा डोणे वाघापूर यांनी भाकणूक घातली. त्यात यंदा नदी तलाव आटतील, उष्णतेच्या लाटा येतील, जलप्रलय होईल, मेघाची कावड गैर हंगामी हुकमी पाऊस दगा देईल. तापमानाचा पारा गगनाला जाईल. पाणीटंचाई भासेल, अशी भाकणूक करण्यात आली.

भाकणूक म्हणजेच भाकीत व्यक्त दोघांनी सांगितले की,दीड महिन्याचे पीक येईल. बैलाची किंमत बकऱ्याला येईल. बकऱ्याची किंमत कोंबड्याला येईल. बकऱ्याचा भाव लाखात जाईल. जगात एक मोठं नवल होईल. मेंढीच्या पोटी मुलगा जन्माला येईल. कळपातला बकरा कळपात लढेल. दुनिया पेटेल काळरात्र येईल. घरातून गेलेला माणूस परत येईल, अशी आशा धरू नका, हातातील भाकरी हातात राहील माणसाचे जगणे धर्माचे मरण हुकमाचे होईल. माणसाला बुद्धी जास्त आयुष्य कमी १८ तऱ्हेच्या माणसाला एक आजार येईल.डॉक्टर लोक हात टेकतील.

# मुरुडमध्ये १५ एप्रिलला दिवसा वीजपुरवठा बंद

**मुरुड**- पावसाळ्याच्या हंगामात कोणताही अडसर येऊ नये, म्हणून केल्या जाणाऱ्या पावसाळी दुरुस्ती कामासाठी १५ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ४.२० वाजेपर्यंत मुरुडमधील वीजपुरवठा बंद राहणार आहे. मुरूडमध्ये सुमारे ३२ हजार वीजग्राहक आहेत.लवकरच पावसाळा सुरू होणार असल्याने वीज महावितरणकडे पावसाळी पूर्वतयारीची जबाबदारी आहे.सर्व मेंटेनन्स कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे, जेणेकरून पावसाळ्याच्या हंगामात कोणताही अडसर किंवा समस्या उद्भवू नये. मुरूड सर्व गावातील व मुरूड शहरातील रहिवाश्यांना सूचित करण्यात येते की, पावसाळी कामासाठी ८ ते १५ एप्रिलदरम्यान दररोज सकाळी १०.ते दुपारी ४.२० या वेळेत वीजपुरवठा बंद करण्यात येणार आहे.

# मुंबईच्या डोंगरी परिसरात ४५१ अवैध सिलिंडर जप्त

■ मुंबई

**मुंबई** शहरातील डोंगरी परिसरात शिधावाटप विभागाच्या भरारी पथकाने मोठी धडक कारवाई करत अवैध गॅस सिलिंडर साठ्याचा पर्दाफाश केला आहे. वाडीबंदर ब्रिज परिसरात टाकलेल्या छाप्यात तब्बल ४५१ गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले असून सुमारे ४०.६१ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. भरारी पथकाने अचानक छापा टाकत अवैध साठेबाजीवर मोठा आघात केला. जप्त केलेल्या मुद्देमालात ८ वाहनांचाही समावेश आहे. या कारवाईमुळे परिसरात कार्यरत असलेल्या अवैध गॅस माफियांचे धाबे दणाणले असून प्रशासनाने अशा प्रकारच्या बेकायदेशीर साठेबाजीविरोधात आपली मोहीम अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

# डिझेल दरवाढ तत्काळ रद्द करा मालवणमध्ये मच्छिमारांचा मोर्चा

■ सिंधुदुर्ग

**मालवण** येथे आज मच्छिमारांनी सवलतीच्या दरात मिळणाऱ्या डिझेलच्या दरात वाढ करण्यात आल्याच्या निषेधार्थ मोर्चा काढला. यावेळी मच्छिमारांनी डिझेल दरवाढ तात्काळ रद्द करावी, अशी मुख्य मागणी यावेळी करण्यात आली. याशिवाय, एलईडी लाईटच्या साहाय्याने होणारी मच्छीमारी त्वरित बंद करावी, अशीही ठाम मागणी मच्छिमारांनी केली. या मोर्चात उबाठाचे नेते वैभव नाईक यांच्यासह उबाठाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना वैभव नाईक म्हणाले की, गेल्या दोन वर्षांत एलईडी धारकांनी किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे. २०१७ पासून एलईडी मच्छीमारीवर बंदी असतानाही सत्ताधाऱ्यांच्या आशीर्वादामुळे ही पद्धत सुरू आहे. ही वेळेत रोखली नाही, तर भविष्यात मासेमारीवर गंभीर परिणाम होऊन मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येऊ शकते.

# धबधब्याजवळ सेल्फी काढताना तीन मैत्रिणींचा मृत्यू

■ अमरावती

**आंध्र** प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू जिल्हा येथील मुलुगुम्मी धबधब्याजवळ सेल्फी घेताना त्रिशा (१७), रत्ना कुमारी (१६) आणि पवित्रा (१६) या अल्पवयीन मैत्रिणींचा बुडून मृत्यू झाला. जांबवलासा गावातील पाच मुली सहलीसाठी धबधब्यावर गेल्या होत्या. यावेळी तिघी पोहत एका मोठ्या खडकावर पोहोचल्या. तिथे उभ्या राहून सेल्फी घेत असताना त्यांचा तोल गेला. त्या थेट धबधब्यात कोसळल्या. पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असल्यामुळे त्यांना बाहेर काढणे शक्य झाले नाही. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र जोरदार प्रवाहामुळे प्रयत्न निष्फळ ठरले. या दुर्घटनेत तिघींचाही मृत्यू झाला असून अन्य दोन मुली सुरक्षित आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

# सीएसएमटी-कुर्ला नव्या मार्गिकांसाठी स्वदेशी मिलमध्ये तोडकामास सुरुवात

**प्रकल्पग्रस्तांच्या स्थलांतराचे काम सुरू**

■ मुंबई

**छत्रपती** शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) आणि कुर्ला स्थानकादरम्यान पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिकांच्या कामातील अखेरचा अडथळा दूर झाला आहे. त्यामुळे तब्बल १७ वर्षांच्या विलंबानंतर मध्य रेल्वे प्रशासन लवकरच या मार्गिकांमध्ये शेवटचा अडथळा ठरणारी स्वदेशी मिलमधील जुन्या बांधकामांचे पाडकाम हाती घेणार आहे.

स्वदेशी मिलच्या चुनाभट्टी-कुर्ला आणि धारावी येथील जमिनीवरील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) जवळपास पूर्ण केले आहे. प्रकल्पग्रस्तांना एमएमआरडीएने अन्यत्र सदनिका वितरित केल्या आहेत. सध्या या प्रकल्पग्रस्तांच्या स्थलांतराचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर मध्य रेल्वे प्रशासन प्रकल्पग्रस्तांनी मोकळ्या केलेल्या घरांचे पाडकाम हाती घेणार आहे. पाडकामासाठी आवश्यक यंत्रसामुग्री, मनुष्यबळ आणि अन्य व्यवस्था सध्या अंतिम टप्प्यात आहे.

रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) आणि गव्हर्मेंट रेल्वे पोलिसांच्या(जीआरपी) अतिरिक्त तुकड्या पाडकामादरम्यान तैनात करण्यात येणार आहेत. हे पाडकाम महिन्याभरात पूर्ण केले जाईल. त्यानंतर सायन पुलाचे काम पूर्ण होताच प्रत्यक्ष पाचवी आणि सहावी मार्गिका टाकण्याचे काम सुरू करण्यात येईल.

# जळगावात महापुरुषाचे बॅनर फाडल्याने तणाव

**समाजकंटकांविरुद्ध कारवाईचे आश्वासन**

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील वाघळी गावात महापुरुषांचे बॅनर अज्ञात व्यक्तींनी फाडल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेच्या निषेधार्थ संतप्त ग्रामस्थांनी आज सकाळी जळगाव-चाळीसगाव महामार्गावर सुमारे दोन तास रास्ता रोको आंदोलन केले.

या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. रस्त्याच्या दुतर्फा तब्बल २ ते ३ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. अज्ञात समाजकंटकांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक पूर्ववत झाली असली तरी गावात तणावपूर्ण शांतता आहे. याठिकाणी आता पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला.


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

Bharose ka Bank Bhavishya ka Bank

₹२५,000 कोटींच्या व्यवसायाची अभिमानास्पद वाटचाल, प्रगतीचा नवा अध्याय

७ राज्यात उपस्थिती

१६५ शाखांचे विस्तृत जाळे

लेखापरीक्षित निकाल

(₹ कोटींमध्ये)

| तपशील | ३१-०३-२०२६ | ३१-०३-२०२५ |
|---|---|---|
| एकूण व्यवसाय | २५,३६0 | २३,१0५ |
| ठेवी | १६,२४४ | १४,८४९ |
| कर्जे | ९,११६ | ८,२५६ |
| ढोबळ नफा | २८७ | २५२ |
| निव्वळ नफा | १५५ | १८५ |
| स्वनिधी | १,७७३ | १,६३९ |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ३.११% | ३.५९% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | 0.00% | 0.00% |
| पुंजी पर्याप्तता | १६.८९% | १७.४८% |

www.tjsb.bank.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466


# लग्नाच्या ५ महिन्यात विवाहितेची आत्महत्या

■ वसई

**वसईत** राहणाऱ्या १९ वर्षीय विवाहित तरुणीने सासरच्या जाचाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. याप्रकरणी माणिकपूर पोलिसांनी तिच्या पतीसह सासरच्या लोकांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. वसईतील उमेळमान येथे राहणाऱ्या सानिया खान (१९) या तरुणीचा नोव्हेंबर २०२५ रोजी शोएब खान (२९) याच्याशी विवाह झाला होता. मात्र लग्नापासूनच तिच्या सासरचे लोकं तिचा छळ करत होते. यामुळे जानेवारी महिन्यात तिने आत्महत्या करण्याचा प्रयत्नही केला होता. नंतरही तिचा छळ सुरू होता. याबाबत तिने आपल्या माहेरच्या लोकांना माहिती दिली होती. दरम्यान, ९ एप्रिल रोजी भांडणानंतर सानियाने गळफास गेऊन आत्महत्या केली. ही आत्महत्या नसून घातपात असल्याचा आरोप करत तित्या माहेरच्या व्यक्तींनी माणिकपूर पोलीस ठाण्यात गोंधळ घातला होता. अखेर माणिकपूर पोलिसांनी पती शोएब खान, नणंद सायनूर खान यांच्यासह दिर अबिद खान, शादाब खान यांच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

# शहीद पोलिसांच्या वारसांना पोलीस उपनिरीक्षक पदावर थेट नियुक्ती

■ मुंबई

**नक्षलविरोधी** कारवाईत शौर्य गाजवताना वीरमरण आलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र सरकारकडून मोठा दिलासा देण्यात आला आहे.

शहीद पोलीस उपनिरीक्षक संतोष महिपत घाग आणि शहीद पोलीस हवालदार हरिदास चिंतामण सयाम यांच्या वारसांना पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) गट-ब (अराजपत्रित) पदावर अनुकंपा तत्त्वावर थेट नियुक्ती देण्याचा महत्त्वपूर्ण आदेश गृह विभागाने जारी केला. या निर्णयानुसार, नक्षलविरोधी कारवायांमध्ये शहीद झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना गट-अ आणि गट-ब संवर्गात नियुक्ती देण्याची तरतूद आहे. त्याच आधारे विराज संतोष घाग आणि विकास हरिदास सयाम यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांना ही विशेष नियुक्ती देण्यात आली आहे. विशेष बाब, म्हणून करण्यात आलेल्या या नियुक्तीत एक महत्त्वाची अट घालण्यात आली असून, दोन्ही नियुक्त अधिकाऱ्यांना गडचिरोली विशेष परिक्षेत्र येथे सेवा बजावावी लागणार आहे. सरकारच्या या निर्णयामागे शहीद जवानांच्या कुटुंबाला सामाजिक सुरक्षा देणे आणि त्यांच्या बलिदानाचा सन्मान करणे हा मुख्य उद्देश आहे.

# मनसे पदाधिकाऱ्यांवर प्राणघातक हल्ला

■ मिरा रोड

**मीरा** रोडमध्ये मनसे पदाधिकारी स्वप्नील तपासे याच्यावर भर रस्त्यात चॉपर आणि कोयत्याने प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. यामुळे तणाव निर्माण झाला असून मीरा रोड पोलिसांनी ५ हल्लेखोरांना अटक केली आहे. मीरा रोड येथील रामदेव पार्क परिसरात महापालिकेतर्फे जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र हे काम संथगतीने असल्याने मनसेचे पदाधिकारी स्वप्नील तपासे हे पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबत गेले होते. यावेळी ते व्हिडिओ शूट करत असताना रावण ठाकूर या इसमाने त्यांच्याशी वाद घालून धमकावण्यास सुरवात केली.त्यानंतर काही वेळातच ठाकूर याचे अन्य साथीदार तेथे पोहोचले. त्यांनी लाकडी दांडके, लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी तपासे यांना मारहाण केली.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# गृहलक्ष्मी होतेय राष्ट्रलक्ष्मी!

भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण सध्या जास्त आहे. देशाची एकूण लोकसंख्या एका अनुमानाप्रमाणे १४७ कोटीपर्यंत पोहोचलेली आहे आणि या लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण जवळपास ६४ कोटींच्यावर आहे. म्हणजे आज भारत हा जगातील असा एकमेव देश ठरतो की, सर्वाधिक लोकसंख्येत भारत पहिल्या क्रमांकावर आहेच. शिवाय लोकसंख्येमध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. म्हणजे आज भारतामध्ये पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झालेले आहे. इतक्या प्रचंड प्रमाणात महिलांची संख्या असल्याने आता महिला अधिकार आणि हक्कांबरोबर अर्थव्यवहारातही पुढाकार घेत असल्याचे दिलासादायक चित्र निर्माण झाले आहे. पुरुषांच्या बरोबरीने म्हणजे समान पद्धतीने विविध संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. किंबहुना तशा प्रकारे हळूहळू आता या दिशेने भारताची वाटचाल सुरू झालेली दिसते. गेल्या काही वर्षांमध्ये महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष उपाय योजले गेले. परंतु केवळ सरकारी योजनाच नव्हे तर स्वतंत्रपणे महिलांमध्ये सुद्धा स्वतःच्या हक्कांविषयी आणि अधिकारांविषयी विशेष जागृती झालेली पाहायला मिळते.

### महिलांचे ७६ लाख कोटी कर्ज

अलिकडच्या काळातला नीती आयोगाच्या सर्वेक्षणात आलेला सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे गेल्या चार वर्षांमध्ये महिलांचे देशातील कर्ज घेण्याचे प्रमाण हे प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. म्हणजे चार वर्षांपूर्वी केवळ १९ टक्के महिला या वेगळ्या कारणांसाठी बँकांकडून कर्ज घेत होत्या. आज त्याच ठिकाणी महिलांची ही संख्या ३६% पर्यंत जाऊन पोहोचलेली आहे. म्हणजेच चार वर्षांपूर्वी १६ लाख कोटी कर्जाचे वितरण महिलांसाठी झालेले होते. ते आता तब्बल ७६ लाख कोटीपर्यंत पोहोचले आहे हे आकडे खरोखरीच थक्क करणारे आहे.

परंतु देशात सर्वाधिक संख्येने असलेल्या महिलांनी व्यवसाय असेल, गृहकर्ज असेल किंवा इतर छोट्या मोठ्या कारणांसाठी अर्थव्यवहारांमध्ये मारलेली ही बाजी विक्रमी ठरते. किंबहुना काहीशी आश्चर्यचकित करणारी सुद्धा म्हणावी लागते. एकेकाळी गृहलक्ष्मी संबोधून घरातच वावरणारी महिला राष्ट्रलक्ष्मीच्या नव्या रुपात धडाडीने पुढे जात आहे. ही बाब केवळ लोकसंख्येतली 'संख्यात्मक वाढ नव्हे' देशाच्या अर्थव्यवहारातली 'गुणात्मक' वाढ नोंदवणारी आहे. यातला आणखीन एक काहीसा धक्कादायकच भाग म्हणजे या कर्ज घेण्याच्या महिलांच्या संख्येमध्ये बिहार राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. दुसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेश आहे आणि महाराष्ट्र मात्र चक्क आठव्या क्रमांकावर आहे. म्हणजे ज्या बिहारला अनेक वेळेला मागासलेले राज्य किंवा अगदी तीस वर्षांपूर्वी बीमारू राज्य म्हणून हिणवले जात होते. आज त्याच बिहारमध्ये सर्वाधिक संख्येने महिला कर्ज घेताना आढळून येतात. बिहारमध्ये जवळपास १५% महिलांचे कर्ज घेण्याचे प्रमाण हे निश्चितच आश्चर्यकारक म्हणावे लागते. महाराष्ट्रात मात्र देशाच्या एकूण महिला कर्जदारांच्या तुलनेत केवळ आठ टक्के संख्या असावी हे तितकेसे भूषणावह ठरत नाही. यातला आणखीन एक सकारात्मक भाग असा आहे की, महिलांनी गृहकारणासाठी घेतलेले कर्ज हे सर्वाधिक आहे. अर्थात अनेक वेळा घर कर्ज घेताना महिलांच्या नावाने कर्ज घेतले जाते. त्यात काही ठिकाणी व्याजामध्ये थोडी सवलत मिळते. शिवाय महिलांच्या नावे घर करण्याचा प्रकारही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे पाहायला मिळतो. परंतु व्यवसायाच्या बाबतीत सुद्धा महिलांनी कर्ज घेण्याचे प्रमाण वाढल्याचे नीती आयोगाच्या अहवालात पाहायला मिळते. देशभरामध्ये व्यवसायासाठी कर्ज घेण्यात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असताना महाराष्ट्र त्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या क्रमांकावर तामिळनाडू आहे. तिथे १५% महिलांनी व्यावसायिक कर्जात आघाडी घेतली. महाराष्ट्रातील जवळपास १०% महिलांनी व्यवसायासाठी बँकांकडून अर्थपुरवठा घेतल्याचे या सर्वेक्षणामध्ये समोर आलेले आहे. तामिळनाडूमध्ये व्यवसायासाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या सर्वाधिक असावी हे सुद्धा काहीसे आश्चर्यकारकच म्हणावे लागते. आपण महाराष्ट्राला विकसित राज्य म्हणतो आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून आपण आपली पाठ थोपटून घेत असतो. परंतु या महाराष्ट्राच्या अर्थकारणामध्ये महिलांची भागीदारी देशातील अन्य राज्यांच्या तुलनेने फारशी समाधानकारक म्हणता येणार नाही.

### हवे सकारात्मक परिवर्तन

व्यावसायिक कर्जदारांच्या संख्येत महिलांची संख्या जरी जास्त असली तरी एकूण देशाच्या महिला कर्जादारांच्या संख्येत महाराष्ट्राचा क्रमांक हा खूप खाली आहे. केवळ आठ टक्के महिला या जर कर्ज घेत असतील तर महाराष्ट्राला महिलांच्या अर्थव्यवहारासाठी अजून बरीच मोठी मजल मारावी लागणार आहे. केवळ लाडकी बहीणसारख्या योजना राबवून हे काम होणार नाही. यासाठी महिलांना महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये जर सामावून घ्यायचे असेल, त्यांच्यातील रोजगार आणि व्यावसायिक क्षमता वाढवायच्या असतील तर त्यांचे अर्थ व्यवहारातले प्रमाण वाढवावे लागेल. आज जरी व्यावसायिक कर्जामध्ये महाराष्ट्रातल्या महिला दुसऱ्या क्रमांकावर असल्या तरी सुद्धा अन्य कर्ज व्यवहारांमध्ये महाराष्ट्रातील महिलांचे प्रमाण वाढवण्याच्या दिशेने प्रयत्न करणे गरजेचे ठरते. ज्यामध्ये गृह कर्ज असेल किंवा वाहन कर्ज असेल यासारख्या गोष्टींमध्ये सुद्धा महिलांचे प्रमाण वाढणे आवश्यक ठरते. एकूणच देशाच्या लोकसंख्येचा विचार करता आज सर्वाधिक लोकसंख्येचा भारत जर सर्वाधिक महिला कर्जदारांचाही देश ठरत असेल तर ते महिलांना मिळालेल्या व्यावसायिक आणि आर्थिक संधींचे ते नवे पर्व ठरते. किंबहुना ते मोठे परिवर्तन म्हणावे लागते. एकीकडे ही दिलासादायक बाब समोर येत असताना ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या पुरेशा संधी मिळत नाहीत ही वस्तूस्थिती आहे. शासन स्तरावर लखपती महिला आणि तत्सम योजना राबवल्या जातात त्यासाठी सुद्धा सरकार प्रोत्साहन देते, जनधन खात्यांमधून सुद्धा छोट्या छोट्या व्यवसायासाठी महिलांना बँकांकडून लघुस्वरूपाचे कर्ज उपलब्ध करून दिले जाते. नीती आयोगाने ही आकडेवारी जाहीर करताना हेही समोर आणायला हवे की, जवळपास ७६ लाख कोटींचे जर कर्ज वितरण महिलांमध्ये झाले असेल तर त्यांच्या कर्ज वसुलीचे प्रमाण काय आहे? याचा सुद्धा तपशील आयोगाने देणे गरजेचे ठरते. जर का महिला कर्ज फेडण्याच्या बाबतीतही तितक्याच तत्पर असतील तर ती बाब सुद्धा पुरुष कर्जदारांसाठी निश्चितच अनुकरण करण्यासाठी ठरू शकते. भारतामध्ये दहा वर्षांपूर्वी महिलांचे लोकसंख्येतले प्रमाण कमी होते आणि महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार आणि हक्क मिळावेत म्हणून सातत्याने मागणी करावी लागत होती. आज त्याच भारतामध्ये जर आर्थिक क्षेत्रात महिला या अशा पद्धतीने पुढाकार घेत असतील तर त्यातून भविष्यकाळासाठी लोकसंख्येतला हा सर्वात मोठा घटक अधिक स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनतो आहे याचे ते तितकेच मोठे निदर्शक ठरू शकते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून केलेल्या कामाला प्रदर्शन म्हणतात आणि एखाद्याचे चांगलं व्हावं म्हणून केलेल्या कामाला प्रार्थना म्हणतात.

## पंचांग

शनिवार ११ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* चैत्र कृष्ण नवमी
नक्षत्र - उत्तराषाढा

रवी उदय- ०६-२६,
रवी अस्त- १८-५४



जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मकर

**महात्मा ज्योतिबा फुले जयंती**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)


संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

**फॉर्म जी**
**विद्युत वाहने आणि इलेक्ट्रॉनिक घटकांच्या संशोधन, विकास व उत्पादन व्यवसायात कार्यरत**
**ब्लू-स्मार्ट चार्ज प्रायव्हेट लिमिटेडकरिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| अ.क्र. | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव आणि पॅन आणि सीआयएन/~~एलएलपी क्र.~~ | ब्लू-स्मार्ट चार्ज प्रायव्हेट लिमिटेड सीआयएनः U63090GJ2019PTC106065 पीएएनः AAHCG6374P |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | नोंद. कार्यालयः १५ वा मजला, ए ब्लॉक, वेस्टगेट बिझनेस बे, एस जी रोड, जिवराज पार्क, अहमदाबाद, अहमदाबाद शहर, गुजरात, भारत, ३८००५१. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | http://www.blu-smart.com |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | दिल्ली, गुरगाव आणि बेंगलुरू |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | सध्या मुख्य उत्पादने/सेवांच्या स्थापित क्षमतेची माहिती उपलब्ध नाही. कॉर्पोरेट ऋणकोच्या मालमत्तांची पडताळणी सध्या चालू आहे. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्रांनुसार, दि. ३१.०३.२०२४ रोजीनुसार कंपनीची उलाढाल ₹ ६,६४६.८८ लाख आहे. |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | निलंबित व्यवस्थापनाद्वारे देण्यात आलेल्या माहितीनुसार, सध्या कॉर्पोरेट ऋणकोद्वारे कोणीही कर्मचारी किंवा कामगार नियुक्त नाही. |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेले तपशील उपलब्ध असणारे यूआरएलः | cirp.bcpl@npvinsolvency.in येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएलः | cirp.bcpl@npvinsolvency.in येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | २६.०४.२०२६ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | ०१.०५.२०२६ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०६.०५.२०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | ११.०५.२०२६ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मूल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | १६.०५.२०२६ |
| १५ | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | १५.०६.२०२६ |
| १६ | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | cirp.bcpl@npvinsolvency.in |
| १७ | कॉर्पोरेट ऋणकोच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीचे तपशील | सीडी एमएसएमई अंतर्गत नोंदणीकृत आहे. (नोंदणी क्र. UDYAM-DL-10-0009454) |

सही/-
आयपीई - एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड)
त्यांचे संचालक, श्री. रितेश प्रकाश अदातिया यांच्या द्वारे
ब्लू-स्मार्ट चार्ज प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात ठराव व्यावसायिक
आयबीबीआय नोंद. क्र.: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/ 50021
एएफए वैधता - ३१ डिसेंबर, २०२६
पत्रव्यवहाराकरिता ईमेलः cirp.bcpl@npvinsolvency.in
दिनांकः ११ एप्रिल, २०२६
ठिकाणः अहमदाबाद




# राजस्थान रॉयल्सचा सलग चौथा विजय

## सूर्यवंशीच्या झंझावाती खेळीपुढे बंगळुरु गारद



**सलामीवीर वैभव सूर्यवंशीने २६ चेंडूंत ७८ धावांची झंझावाती खेळी केल्यामुळे राजस्थान रॉयल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूला ६ विकेट आणि १२ चेंडू शिल्लक राखून पराभूत केले. राजस्थानचा या हंगामातील हा सलग चौथा विजय आहे. गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या १६ व्या सामन्यात बंगळूरूने राजस्थानला विजयासाठी २०२ धावांचे लक्ष्य दिले होते. ते राजस्थान रॉयल्सने ४ विकेट गमावून १८ षटकांत सहज पूर्ण करून विजयासह आयपीएलच्या गुणतालिकेत ८ गुणांसह अव्वल स्थान कायम ठेवले.**

■ गुवाहाटी

**राजस्थानने** प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरुचे सलामीवीर फिलिप सॉल्ट पहिल्याच चेंडूवर आउट झाला. मग पाडीकल ७ चेंडूंमध्ये १४ धावा करून बाद झाला. विराट कोहलीने काही चांगले फटके मारले. मात्र त्याचा रवी बिश्नोईने त्रिफळा उडवला. त्याने १६ चेंडूंत ३२ धावा करून माघारी परतला. कृणाल पंड्या (१) रवी बिश्नोईच्या चेंडूवर षटकार मारण्याच्या नादात झेलबाद झाला. जितेश शर्मा ५, टीम डेव्हिड १३, रोमारियो शेफर्ड २२ धावांवर बाद झाला. मग कर्णधार रजत पाटीदारने राजस्थानच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. मात्र तो ४० चेंडूंत ६३ धावा करून झेलबाद झाला. व्यंकटेश अय्यरने अखेरच्या षटकात २० धावा ठोकल्या. त्यामुळे बंगळुरुने ८ बाद २०१ धावांपर्यंत मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना राजस्थानचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल ८ चेंडूंत १३ धावा करून तंबूत परतल्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि ध्रुव जुरेल यांनी चौकार व षटकार ठोकून बंगळुरुच्या गोलंदाजांना आस्मान दाखवले. सूर्यवंशीने १५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. या जोडीच्या फटकेबाजीमुळे राजस्थानची धावसंख्या पावरप्लेच्या ६ षटकांत १ बाद ९७ वर पोहोचली होती. मात्र सूर्यवंशी आपले अर्धशतक पूर्ण करेल असे वाटत असताना कृणाल पंड्याच्या चेंडूवर झेलबाद झाला. सूर्यवंशीने २६ चेंडूंत ७ षटकार आणि ८ चौकारांसह ७८ धावा ठोकल्या. शिमरॉन हेटमायरला साधा भोपळाही फोडता आला नाही. कर्णधार रियान पराग ३ धावांवर झेलबाद झाला. जुरेलने २५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. जडेजाने २४ धावा आणि जुरेलने ८१ धावांची नाबाद खेळीमुळे राजस्थानने ६ विकेटने विजय मिळवला.

# पंजाब आज हैदराबादला टक्कर देणार! चेन्नई विजयाचे खाते उघडणार

■ चेन्नई/चंदीगड

**आयपीएल** स्पर्धेत उद्या डबल हेडर म्हणजेच दोन सामने होणार आहेत. न्यू चंदीगडच्या महाराजा यादविंद्र सिंग क्रिकेट स्टेडियममध्ये उद्या दुपारी ३.३० वाजता होणाऱ्या १७ व्या सामन्यात पंजाब किंग्सचा संघ सनरायझर्स हैदराबादला टक्कर देणार आहे, तर रात्री ७.३० वाजता चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियममध्ये १८ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने येणार आहेत. पंजाबचा संघ तिसऱ्या विजयाच्या शोधात असून, हैदराबाद दुसरा विजय मिळवण्यासाठी मैदानावर उतरेल. चेन्नईचा संघ विजयाचे खाते उघडण्याचा प्रयत्न करणार आहे. दिल्ली तिसरा विजय नोंदवण्यासाठी सज्ज झाला आहे. आयपीएलमध्ये चेन्नई आतापर्यंत सामने खेळला आहे. मात्र या तिन्हीही सामन्यांत चेन्नईला लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे चेन्नईचा संघ आयपीएलच्या गुणतालिकेत ० गुणासह शेवटच्या स्थानावर आहे. दिल्लीने तीनपैकी दोन सामने जिंकले आहेत. त्यामुळे गुणतालिकेत दिल्ली ४ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. पंजाब आतापर्यंत तीन सामने खेळला आहे. त्यातील दोन सामन्यांत विजय मिळवला असून, एक सामना पावसामुळे रद्द झाला आहे. परिणामी पंजाब गुणतालिकेत पाच गुणांसह दुसऱ्या स्थानावर विराजमान आहे.

# फिडे चेस कँडिडेट्स स्पर्धा! वैशाली ड्रॉसह अव्वल स्थानी

■ पाफोस

**सायप्रसच्या** पाफोसमध्ये खेळली जात असलेल्या फिडे चेस कँडिडेट्स स्पर्धेच्या महिला गटातील १० व्या फेरीत भारतीय ग्रँडमास्टर वैशाली रमेशबाबूने युक्रेनच्या एना मुजिचुकविरुद्ध ड्रॉ खेळला. त्यामुळे अर्ध्या गुणासह वैशाली अव्वल स्थानावर पोहोचली. भारतीय ग्रँडमास्टर दिव्या देशमुखला रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिना विरुद्ध पराभव पत्करावा लागला. ओपन गटात भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदाला उझबेकच्या जावोखिर सिंदारोव्ह विरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवानंतर प्रज्ञानानंदा ७ व्या स्थानावर घसरला. या स्पर्धेत अजून ४ फेऱ्या बाकी आहेत. टॉप-६ खेळाडूंमध्ये १ गुणाचा फरक १० व्या फेरीत वैशालीला फारशी अडचण आली नाही व सामना चढ-उतारांशिवाय ड्रॉ राहिला. झू जिनेरला बिबिसारा उझबेक विरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले, ज्यामुळे वैशालीला आघाडी मिळाली. स्पर्धेच्या महिला गटातील चुरस अत्यंत रोमांचक बनली असून, टॉप-६ खेळाडूंमध्ये १ गुणाचा फरक आहे. झू जिनेर व अन्ना मुजिचुक ५.५ गुणांसह वैशालीपेक्षा अर्धा गुण मागे आहेत. ११ व्या फेरीत वैशालीचा सामना गोरियाचकिनाशी होईल, तर दिव्या झू जिनेरविरुद्ध खेळेल.

# इंडोनेशियाच्या क्रिस्टीला पराभूत करून आयुष शेट्टी उपांत्य फेरीत

■ नवी दिल्ली

**आशिया** बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय युवा बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीला २३-२१, २१-१७ ने पराभूत करून आपला प्रभावी फॉर्म कायम ठेवला. आता त्याने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. टूर स्तरावर शेट्टी आणि क्रिस्टी यांच्यातील ही पहिलीच लढत होती. क्रिस्टी हा आशियाई क्रीडा स्पर्धा आणि आशियाई चॅम्पियनशिपमधील सुवर्णपदक विजेता आहे. २०२० मध्ये थॉमस कप जिंकणाऱ्या इंडोनेशियन संघाचाही तो एक भाग होता. यूएस ओपन सुपर ३०० चा गतविजेता असलेल्या शेट्टीने १६ च्या फेरीत चायनीज तैपेईच्या २० व्या क्रमांकावरील ची यू जेनचा पराभव केला होता.

### यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या दोघांना कांस्य

**नाशिक** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या दोघा खेळाडूंनी सांगली येथील कृष्णा बोट क्लब येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय कॅनोइंग व कयाकिंग क्रीडा स्पर्धेत दोन कांस्यपदक पटकावले. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांचे ६८५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी झाले होते.

**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय सांगली शहर अंतर्गत उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी व रोहीत्र प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती कामासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. वरील निविदा ई-निविदा पध्दतीनेच भरता येतील. सदर निविदा करारासाठी मान्यता प्राप्त नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांसाठी ई-निवीदा खालील प्रमाणे महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावर https://etender.mahadiscom.in/eatApp/# दि. ११.०४.२०२६. वेळ ००.०० पासुन उपलब्ध आहेत. निविदा सादर करणेची अंतीम तारीख - २०.०४.२०२६ वेळ २३.५५ वाजेपर्यंत राहील.

| अ. क्र. | निविदा क्र | निविदा रक्कम रु (लक्ष) | बयाना रक्कम |
|---|---|---|---|
| १ | EE/SGLU/T/PM/ LT HT & DTC/T-01/2026-27 | रु ४८ लक्ष | ४८०००/- |

मोबाईल क्र - ७८७५७६९४७१
PRO/KOPZ/ १३ /२०२६-२७
कार्यकारी अभियंता, सांगली शहर विभाग

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र. सहा.आयुक्त/एच-पूर्व/१२/घकव्य दि. १०.०४.२०२६

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | सहाय्यक आयुक्त एच/पूर्व |
| महा निविदा क्र. | २०२६_बृमुंमपा_१२१३१४२_१ |
| विषय | घन कचरा व्यवस्थापन एच/पूर्व प्रभागाच्या सांताक्रुझ-१ चौकी येथे हवामान-रोधक आवरण आणि प्रवेश-नियंत्रण प्रणालीची निर्मिती आणि उभारणी. |
| निविदा-विक्री | दि. ११.०४.२०२६ रोजी १०.०० पासून ते दि. १७.०४.२०२६ रोजी १६.०० पर्यंत |
| बोली उघडण्याचा दिनांक | दि. १८.०४.२०२६ रोजी १६.०० वा. |
| वेबसाईट | https://mahatenders.gov.in |
| संबंधित व्यक्ती | एई(घकव्य) एच/पू, एसई(घकव्य)एच/पू, |
| नाव | श्री. वैभव बिरारी (एई(घकव्य)एच/पू) - ९१२०२५३०१० श्री. सतिशकुमार सुलाखे (एसई(घकव्य)एच/पूर्व) ९८६७२०५६८२ |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२-२६१३८९०० |
| ईमेल आयडी | ae01heast.swm@mcgm.gov.in |

सही/-
पीआरओ/६३/जाही./२०२६-२७
सहाय्यक आयुक्त एच/पू प्रभाग

खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**ई निविदा सूचना क्रमांक ०४/२०२६-२०२७ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | कुडाळ औद्योगिक क्षेत्र... कुडाळ एमआयडीसी मुख्य रस्ता ते पाट रस्ता तसेच मुख्य अंतर्गत रस्त्याचे रुंदीकरणासह काँक्रिटीकरण करणे. | ₹ २३,२०,०९,८९०.०० |
| २ | कुडाळ औद्योगिक क्षेत्र... कुडाळ एमआयडीसी सर्कल ते पिंगुळी म्हापसेकर तिटा (वेंगुर्ला रस्ता) रुंदीकरणासहीत काँक्रिटीकरण करणे. (कुडाळ औद्योगिक क्षेत्रालगतचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा रस्ता) | ₹ ३,९६,३१,८९२.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २०/०४/२०२६ ते दिनांक १४/०५/२०२६ व अ.क्र.२ वरील कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २०/०४/२०२६ ते दिनांक ०४/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील अ.क्र.१ वरील कामाबाबत दिनांक २७/०४/२०२६ पूर्वी व अ.क्र.२ वरील कामाबाबत दिनांक २३/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र.१ वरील कामाबाबत दिनांक ०४/०५/२०२६ पासून व अ.क्र. २ वरील कामाबाबत दिनांक २७/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

६ चंदेरी च्वींगम
मुंबई। शनिवार
११ एप्रिल, २०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# हंसिका मोटवानीचा वहिनी विरुद्ध मानहानीचा दावा

**दाक्षिणात्य** आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री हंसिका मोटवानी हिने आपली वहिनी मुस्कान नॅन्सी जेम्स हिच्याविरोधात २ कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला आहे. मुंबईतील दिंडोशी सत्र न्यायालयात हे प्रकरण सादर करण्यात आले असून, कौटुंबिक वादाने आता कायदेशीर वळण घेतले आहे. हंसिकाने आपल्या याचिकेत मुस्कानकडून सार्वजनिक माफीची मागणी केली असून, तिच्यावर बदनामीकारक वक्तव्ये करण्यास बंदी घालावी अशी विनंती न्यायालयाला केली आहे. या दाव्यात म्हटले आहे की, मुस्कानने सामाजिक माध्यमांवर हंसिका आणि तिचा भाऊ प्रशांत मोटवानी यांच्यावर घरगुती हिंसाचाराचे बिनबुडाचे आरोप केले आहेत. या आरोपांमुळे हंसिकाच्या प्रतिमेला मोठी बाधा पोहोचली आहे. मुस्कानने लग्नानंतर तिच्याकडून २७ लाख रुपये उसने घेतले होते, जे वारंवार मागणी करूनही परत केलेले नाहीत. कर्ज परत न करण्याच्या उद्देशानेच मुस्कानने हे खोटे आरोप केल्याचा दावा हंसिकाने केला आहे.

दुसरीकडे, मुस्कान नॅन्सी जेम्स हिने यापूर्वीच हंसिका आणि प्रशांत यांच्याविरोधात छळ आणि क्रूरतेचा गुन्हा नोंदवला आहे. लग्नातील कार्यक्रमांदरम्यान अवास्तव मागण्या केल्याचा आणि वैयक्तिक आयुष्यात हस्तक्षेप केल्याचा आरोप तिने केला होता. या मानसिक तणावामुळे आपल्याला 'बेल्स पाल्सी' (चेहऱ्याचा अर्धांगवायू) झाल्याचेही तिने तक्रारीत नमूद केले होते. या प्रकरणाची पुढील सुनावणी दिंडोशी न्यायालयात पार पडणार आहे.









## 'महावतार'मध्ये विकीसोबत श्रद्धा?

'छावा' चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर अभिनेता विकी कौशल आता 'महावतार' या भव्य चित्रपटासाठी सज्ज झाला आहे. मॅडॉक फिल्म्सच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात विकीच्या जोडीला कोणती अभिनेत्री असेल, याबाबत चित्रपटसृष्टीत मोठी उत्सुकता होती. आता ताज्या वृत्तानुसार, या भूमिकेसाठी श्रद्धा कपूरच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. निर्मात्यांनी श्रद्धाशी याबाबत संपर्क साधल्याचे सांगितले जात आहे. निर्मात्यांना स्टार व्हॅल्यू मोठी असणाऱ्या अभिनेत्रीची गरज होती आणि श्रद्धा त्यात चपखल बसते.

विकी आणि श्रद्धा ही जोडी प्रेक्षकांसाठी पूर्णपणे नवी आणि आश्वासक ठरेल, असा विश्वास निर्मात्यांना वाटत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अमर कौशिक करणार असून, जून महिन्यानंतर या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होण्याची शक्यता आहे. यापूर्वी या भूमिकेसाठी दीपिका पदुकोणच्या नावाचीही चर्चा झाली होती. मात्र, आता श्रद्धाचे नाव आघाडीवर असल्याचे समजते. श्रद्धा 'स्त्री' या अत्यंत यशस्वी फ्रँचायझीमुळे या बॅनरची मुख्य चेहरा बनली आहे. मॅडॉक फिल्म्ससोबतचा हा तिचा पाचवा चित्रपट असेल आणि विकी कौशलसोबत ती पहिल्यांदाच पडद्यावर दिसेल.


## 'किरण अब्बावरम १५' चे टीझर पोस्टर प्रदर्शित




दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता किरण अब्बावरम याच्या आगामी भव्य 'पॅन-इंडिया' चित्रपटाचे टीझर पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. 'किरण अब्बावरम १५' असे तात्पुरते नाव असलेल्या या चित्रपटासाठी झी स्टुडिओज आणि निर्माती प्रेरणा अरोरा यांनी हातमिळवणी केली असून, हा एक भव्य 'मायथो-फँटसी' विषयावर आधारित चित्रपट असणार आहे. या पोस्टरमध्ये किरण अब्बावरम एका गूढ जंगलात योद्ध्याच्या भूमिकेत दिसत आहे, तर पार्श्वभूमीला आकाशात एक अवाढव्य दैवी चेहरा दिसून येतो. हे पोस्टर चित्रपटाची भव्यता, नियती आणि एका महाकाव्याचा आभास करून देते. भारतीय अध्यात्मिक प्रतिमांचा वापर करून हा चित्रपट जागतिक स्तरावरील दृश्य अनुभवासाठी सज्ज असल्याचे दिसून येते. या चित्रपटाबद्दल सांगताना निर्मात्यांनी स्पष्ट केले की, हा चित्रपट काळ आणि नियतीच्या पलीकडे असलेल्या एका प्राचीन शक्तीने निवडलेल्या रक्षकाची कथा आहे, जो जगाचे नियम बदलण्यासाठी सज्ज झाला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या चित्रपटात एका प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्रीची वर्णी लागणार असून, तिचे नाव लवकरच जाहीर केले जाईल. चित्रपटाच्या संगीतासाठी निर्माते हॉलिवूडमधील नामांकित संगीतकार आणि भारतातील दिग्गज प्रतिभा यांच्याशी चर्चा करत आहेत. भारतीय पारंपरिक ध्वनी आणि पाश्चात्य सिम्फनी यांचा मेळ घालून एक जागतिक दर्जाचे पार्श्वसंगीत देण्याचा त्यांचा मानस आहे.

## 'नागाबंधम'मध्ये ऋषभचा डबलरोल

'फायटर' चित्रपटातील अझहर अख्तर या भूमिकेतून प्रेक्षकांच्या मनावर आपली छाप पाडणारा अभिनेता ऋषभ साहनी आता एका नव्या आणि आव्हानात्मक अवतारात रुपेरी पडद्यावर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. आगामी 'नागाबंधम' या भव्य चित्रपटात ऋषभ दुहेरी भूमिका साकारणार असून, त्याबाबतची अधिकृत माहिती नुकतीच समोर आली आहे. या चित्रपटात तो इतिहासातील क्रूरकर्मा अहमद शाह अब्दालीची भूमिका साकारणार असून, या पात्राचा पुनर्जन्म एका आधुनिक आणि स्टायलिश व्यक्तीच्या रूपात दाखवला जाणार आहे. ऋषभच्या कारकिर्दीसाठी ही भूमिका एक महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे, कारण 'फायटर'मधील त्याच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक झाले होते आणि आता त्याला एकाच वेळी दोन भिन्न स्वभाववैशिष्ट्ये असलेले पैलू पडद्यावर साकारण्याची संधी मिळाली आहे. दिग्दर्शक विराट कर्ण या चित्रपटात मुख्य भूमिकेत असून, तो भगवान शिवाच्या रूपाने प्रेरित अशा विविध आक्रमक अवतारात दिसणार आहे. चित्रपटाची भव्यता आणि त्यातील कलाकारांची फौज पाहता, हा एक मोठा बहुभाषिक प्रकल्प ठरण्याची चिन्हे आहेत.



## चर्चा शेफाली शाहच्या पोस्टची



आपल्या कसदार अभिनयाने आणि भूमिका निवडीतील चोखंदळपणाबाबत ओळखली जाणारी अभिनेत्री शेफाली शाह सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. 'सत्या'मधील आश्वासक भूमिकेपासून ते 'दिल्ली क्राईम'मधील 'डीसीपी वर्तिका चतुर्वेदी'पर्यंतचा तिचा प्रवास प्रेक्षकांसाठी नेहमीच कौतुकाचा विषय ठरला आहे. अलीकडेच शेफालीने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर केवळ नवे नवे नवे असे तीन शब्द लिहून एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टसोबत तिने कोणताही अधिक संदर्भ दिलेला नाही. तिच्या या मोजक्या शब्दांनी चाहत्यांच्या आणि चित्रपट वर्तुळातील जाणकारांच्या मनात उत्सुकता निर्माण केली आहे. तिची अलीकडची कामगिरी आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवरील वाढती लोकप्रियता पाहता, ही पोस्ट एखाद्या नवीन वेब मालिकेची किंवा मोठ्या चित्रपटाची घोषणा असू शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे. काही चाहत्यांच्या मते, ती केवळ अभिनयापुरती मर्यादित न राहता लेखन किंवा दिग्दर्शन यांसारख्या सर्जनशील क्षेत्रातही पाऊल टाकू शकते. अधिकृत घोषणा होईपर्यंत सर्वांचे लक्ष आता शेफालीच्या पुढील पोस्टकडे लागले आहे.

## पलाश सेनचे नवे गाणे



गायक पलाश सेन यांनी नुकतेच त्यांचे एक नवीन गाणे प्रदर्शित केले असून, सध्याच्या वेगवान आणि 'शॉर्ट फॉरमॅट' कंटेंटच्या युगात अत्यंत संयमाने ही कलाकृती साकारल्याचे त्यांनी म्हटले आहे. इन्स्टाग्रामवर आपल्या नवीन संगीत व्हिडिओची झलक शेअर करताना त्यांनी स्पष्ट केले की, 'युफोरिया' बँडचे चाहते आणि दर्जेदार रसिक या गाण्याचा अधिक आनंद घेतील. आजकाल लोक झटपट आणि उथळ आशय पाहण्याकडे झुकत असताना, आपण 'सब्र' म्हणजेच संयम राखून काहीतरी वेगळे देण्याचा प्रयत्न केल्याचे पलाश यांनी नमूद केले. वाळवंटातील पार्श्वभूमीवर आधारलेली ही एक नवी कथा असून, हे केवळ एक गाणे किंवा चित्रपट नसून ती एक भावना असल्याचे त्यांनी आपल्या 'मरहबा' या संदेशासह चाहत्यांना सांगितले आहे.

'धूम पिचक धूम' या पलाशच्या पहिल्या अल्बमने व्यावसायिक यशाचे सर्व उच्चांक मोडले आणि जागतिक स्तरावर समीक्षकांची दाद मिळवली. पाच यशस्वी स्टुडिओ अल्बम आणि सतरा संगीत व्हिडिओंच्या जोडीने 'युफोरिया' हा भारतातील एक अग्रगण्य बँड बनला. पलाश यांनी मेघना गुलजार दिग्दर्शित 'फिलहाल' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. आता या नव्या गाण्याला कसा प्रतिसाद मिळतो हे पाहायचे.

## ५ रुपयांची मोठी किंमत

**काल दुपारी बायकोची शाळा दुपारीच सुटल्याने, घोटवडे फाटा येथे तिला घेण्यासाठी बाईकवर गेलो होतो. तिला म्हणालो, काहीतरी खाऊया. भूक लागलीय ती म्हणाली चला शेजारी जोशी वडेवाला आहे, तेथे वडापाव खाऊ. दुकानात गेलो असता, तेथे १० / १२ मजूर वडापाव घेऊन खात बसलेले होते. त्यांचा पेहराव पाहिला की कोणीही म्हणू शकलं असते की हे बिगारी कामगार आहेत. त्याच्या चेहऱ्यावर शांत भाव, थोडासा गंभीर, कपडे मळकट होते. त्यांची कामाची चर्चा चालू होती. दोघेजण इकडे तिकडे पाहत होते.**



सोमिनाथ घोळवे

**शॉपच्या** काऊंटरला गेलो म्हणालो, तीन वडापाव आणि एक ताक द्या. लगेच प्रिंट बिल आलं. काऊंटरवाला म्हणाला १०० रुपये द्या कारण २० रुपयांचा वडापाव, २५ रुपयाला झाला होता. तसेच २० रुपयाचे ताक २५ रुपयाला प्रिंटमध्ये दिसून आलं.

लगेच माझ्या लक्षात आलं, की गॅस टंचाईमुळे खाद्यान्नाचे दर वाढले आहेत.

देणारा व्यक्ती मला म्हणाला, बसा मी आणून देतो. मी आणि बायको टेबलवर बसलो. बायको आणि माझी चर्चा सुरू झाली. म्हणालो, प्रत्येक खाद्यान्नाच्या किंमती किमान ५ रुपयाने वाढल्या आहेत. ती म्हणाली,' हो, आताच वाढल्या नाहीत तर युद्ध सुरू झालं की पाचच दिवसांमध्ये गॅस टंचाई निर्माण झाल्याच्या अफवेने हॉटेलवाल्यांनी किमती वाढवल्या आहेत. भाववाढ करायला निमित्त मिळालं. मी तिला, हो, म्हणालो. तसेच खाद्यतेल, किराणा मालाच्या किमती कशा वाढल्या. पण शेतकऱ्यांकडील शेतमालाच्या किमती कशा घसरल्या हे सांगत होतो.

तर दुसरीकडे मनात चलबिचल देखील चालू होती. किती लोकांना (मजूर, विद्यार्थी व इतर) पोटासाठी तडजोड करावी लागतेय. एकीकडे पोटाला चिमटा काढणारा मजूर तर दुसरीकडे कशाचीही चिंता नसलेला मध्यमवर्ग, सरकारी, खासगी नोकरदार, व्यापारी, व्यावसायिक, राजकीय नेतृत्व. असे आठवत होते.

माझी आणि बायकोची चर्चा चालू असताना, एक मजूर माझ्याकडे पाहत होता. तो काही बोलणार तेवढ्यात म्हणालो, काय चालू आहे, काही बोलायचे का?

तर तो (रमेश) म्हणाला हो म्हणाला.

म्हणालो, बोला त्यावर मजूर म्हणाला, तुम्ही वडापावच्या किमती वाढल्या यावर काहीतरी बोलत होतात, म्हणालो हो समोरून मजूर काही बोलणार तेवढ्यात म्हणालो, दुपारचे जेवण केले नाही. वडापाव घेऊन खातात.

रमेश म्हणाला, हो. नेहमीचं झालं आहे. पगार पुरेसा मिळत नाही, त्यामुळे अधूनमधून येतो, वडापाव खायला.

म्हणालो, किती लोक असतील ते दुपारी जेवण न करता, वडापाव खात असतात. मजूर (रमेश) म्हणाला, किमान २० टक्के तरी कंपनीतील असतील. पण वडापाव खाणे देखील स्वस्त राहिलं नाही.

म्हणालो, का?

मजूर म्हणाला, दिवसेंदिवस महागाई वाढते, असेच काहीतरी कोरोना, गॅस टंचाई) आले तर वर्ष वाया जाते. जेवणाचे पैसे वाढले म्हणून दुपारचे जेवण सोडले आहे, आता वडापाव खाणे सोडायची वेळ आली आहे, असं का म्हणता, म्हणालो,

तर रमेश म्हणाले, एकतर वडापाव छोटा करतात किंवा त्याचा रेट वाढवतात. अलीकडे वडापावची साईज कमी झाल्याने, दोन वडापाववर पोट भरत नाही.

राईस प्लेट घ्यावी तेवढे पैसे देण्यासाठी नाहीत. नेमके करावे काय? दुसरीकडे आजारी पडल्यावर डॉक्टरांकडे गेले तर हे, खा. ते खा. असं खा. असे बरेच काही खायला सांगितले जाते. नेमके जगावं कसं हा प्रश्न पडलाय असे रमेशने सांगितले.

रमेशच्या बोलण्यावर मी मला काय बोलावे काहीच सुचेना..... मी शांत झालो. गावाकडचा विषय काढला. वेळ मारून नेली. थोडीशी विचारपूस केली.

घरी आल्यावर मन काही केल्या शांत होईना.. वडापाव ५ रुपयाने महाग झाला आहे. ५ रुपये मध्यमवर्गाला खूपच किरकोळ वाटत असतील. पण कष्टकरी, मजुरांना या ५ रुपयांचे मुल्य आहे. कारण २५ रुपयांचा वडापाव जर २० रुपयांना द्या असे एखादा दुकानदार देईल का? एकवेळ जेवण आणि एकवेळ वडापाव खाऊन दिवस काढणारे शहरांमध्ये किमान २० टक्के बिगारी व असंघटित कामगार सापडतील. अनुभव घ्यायचा असेल तर वडापाव सेंटर जिथे आहे, तेथे सकाळी, दुपारी जाऊन पाहा. कामगार येतात आणि ते जेवण न करता वडापाव का खातात हे विचारा. बरं हे फक्त वडापावच्या बाबतीत आहे असे नाही. तर पाणीपुरी, भजी, राईस प्लेट, डोसा, राईस घ्या, असे कोणतेही नाश्त्याला पदार्थ घ्या. त्यांच्याबाबतीत असे भाववाढ झाली आहे. ऊर्जा (गॅस)/तेल टंचाईने हे वाढवलेले भाव पुन्हा कमी होतील का?. तर याचे उत्तर नाही असेच आहे. पण कायमस्वरूपी ५ रुपयांचा अधिक खर्च गरीब, कष्टकरी, अंगमेहनत करतात असा टाकलेला आहे. गॅस मिळणे हळूहळू सुरळीत झाले आहे , पण खाद्यपदार्थांच्या वाढलेल्या किमती कमी होणार नाहीत हे मात्र निश्चित. परिणामी ५ रुपयांना गरिबाच्या खिशाला कात्री लागली आहे. हे कष्टकरी त्यांचे दुःख कोणाला सांगणार आहे?. ऐकणार तरी कोण? येथे सत्ता आणि टक्केवारी याच्या पलीकडे काहीच चालत नाही.

## आई मोबाईलवरून ओरडली १५ वर्षीय मुलीची आत्महत्या

■ नालासोपारा

**मोबाईल** बघू नको, अभ्यास कर असे सांगत आई ओरडल्याने १५ वर्षांच्या मुलीने गळफास घेत आत्महत्या केली. नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथे ही घटना घडली. राजलक्ष्मी तिवारी (१५) ही नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथील बागपाडा चाळीत राहत होती. ती सतत मोबाईलवर वेळ घालवत होती. त्यामुळे तिचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ लागले होते. त्यामुळे तिची आई सतत तिला बोलत असायची. त्यामुळे तिने घराच्या छताला लोखंडी फॅनच्या हुकाला नायलॉनच्या दोरीने गळफास लावून घेतला. तिला उपचारासाठी पालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तिला मयत घोषित केले. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात अपमृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## टीजेएसबीचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर

■ ठाणे

**देशातील** चौथ्या क्रमांकाची बहुराज्जीय सहकारी बँक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडने दिनांक ३१ मार्च रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षासाठी आपले लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. मागील १५ वर्षांप्रमाणे यंदाही१० एप्रिल रोजी लेखा परीक्षित निकाल जाहीर करण्याची परंपरा बँकेने कायम ठेवली आहे.

एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत बँकेने आपल्या ५४व्या वर्षात एकूण व्यवसायाचे २५,००० कोटी रुपयांचे उद्दिष्ट पार केले आहे. तसेच, राजस्थान आणि छत्तीसगड या दोन नवीन राज्यांमध्ये विस्तार करून बहुराज्जीय सहकारी बँक म्हणून आपली स्थिती अधिक भक्कम केली आहे. वर्षभरात नवीन शाखा सुरू करणे आणि धोरणात्मक विलिनीकरणांमुळे बँकेच्या एकूण शाखांची संख्या आता १६५ झालेली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेचा एकूण व्यवसाय २५,३६० कोटी रुपये इतका नोंदविण्यात आला असून, यात




१६,२४४ कोटी रुपये ठेवी आणि ९,११६ कोटी रुपये कर्ज वाटपाचा समावेश आहे. बँकेने २८७ कोटी रुपयांचा एकूण नफा तर १५५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदविला आहे. या निमित्ताने घेतलेल्या पत्रकार परिषदेत अध्यक्ष शरद गांगल, उपाध्यक्ष वैभव सिंगवी, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर उपस्थित होते.

## लोअर परळ जागेचा वापर! लोढा यांच्या विरोधात आंदोलन

■ मुंबई

**लोअर** परळ येथील रेल्वे पुलाखालील मोकळ्या जागेवरून वाद निर्माण झाला आहे. ज्येष्ठ नागरिकांकरीता विरंगुळा केंद्र, लहान मुलांकरीता गार्डन तसेच तरुणांकरीता ओपन जिम इ. सुविधा निर्माण करून त्याचा सध्या होणारा दुरूपयोग टाळावा म्हणून महापालिकेकडे प्रस्ताव सादर करून बैठक आयोजित केली होती. मात्र, मंत्री मंगलप्रभात लोढा हे मुंबई पालिकेच्या अधिकाऱ्यांवर दबाव आणून ही मोकळी जागा शिवकल्याण केंद्र या केंद्रास द्यावी. म्हणून पत्रव्यवहार व बैठक घेत आहेत, असे उबाठाचे आमदार अजय चौधरी यांनी आणि पालिकेतील विरोधी पक्षनेता किशोरी पेडणेकर यांनी म्हटले आहे. याचा निषेध करण्याकरीता शनिवार ११ एप्रिल रोजी सकाळी १०.०० वाजता करीरोड नाका येथे स्थानिक रहिवाशांच्या वतीने उपोषण केले जाणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या जी/ दक्षिण कार्यालयाने यासंदर्भातील आराखडे मंजुरीकरीता मुख्य कार्यालयाकडे सादर केले होते. मी जिल्हा नियोजन बैठकीत पालकमंत्र्यांकडून या सुविधांकरीता ३ कोटी रुपयांचा निधी नगरविकास खात्याकडून वर्ग करून घेतला. हा संपूर्ण रहिवाशी पट्टा असून, येथे कष्टकरी, गिरणी कामगार तसेच ग्रामस्थांच्या खोल्या व म्हाडा इमारतीतील रहिवाशी असून या रहिवाशांचा या मोकळ्या जागेवर नैतिक अधिकार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्थानिकांना देण्यात येणाऱ्या या सुविधांवर कोणीही खासगी संस्थांच्या माध्यमातून डल्ला मारण्याचा प्रयत्न केला तर स्थानिक रहिवाशी सहन करणार नाही, असे आमदार अजय चौधरी यांनी म्हटले आहे.

## ॲसिड कंपनीत गळतीमुळे स्फोट! जीवितहानी नाही

■ भाईंदर

**काशिमीरा** परिसरातील आशा ॲसिड सप्लाय या कंपनीत गळती होऊन स्फोट झाला. स्फोटानंतर मोठ्या प्रमाणात ॲसिड कंपनीच्या परिसरात पसरले होते. अग्निशमन दलाने गळती थांबवून परिस्थिती नियंत्रणात आणली. काशिमिरा येथील लक्ष्मी बाग परिसरात आशा ॲसिड सप्लाय नावाची ॲसिड पुरवठा करणारी कंपनी आहे. शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास टँकरमधून ॲसिड गळती झाली. यावेळी मोठा स्फोट झाला आणि धूर निघाला. यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाने अडकलेल्या सर्व कामगारांना सुरक्षित बाहेर काढून गळती थांबवली. या स्फोटामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## महाराष्ट्रात टीईटी परीक्षा कन्नड भाषेतूनही घेण्याची मागणी

■ सोलापूर

**टीईटी** अर्थात महाराष्ट्र राज्य शिक्षक भरती परीक्षा शिक्षक पात्रता चाचणी कन्नड माध्यमातही घेण्यात यावी. त्याचा फायदा महाराष्ट्राच्या सीमावर्ती असलेल्या भागातील तरुणांना होईल. त्यासाठी कर्नाटक सीमा क्षेत्र विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांना पत्र पाठविले आहे.


महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या सोलापूर, सांगली जिल्ह्यातील जत, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये आणि मुंबई शहरामध्ये एकूण ३७७ कन्नड माध्यमांच्या शाळा आहेत. त्यामध्ये अंदाजे एकूण ४४,८५० विद्यार्थी कन्नड माध्यमातून शिक्षण घेत आहेत. कन्नड माध्याच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या कन्नड शिक्षकांना कन्नडऐवजी मराठी अथवा इंग्रजी माध्यमात टीईटी देणे अशक्य आहे. माध्यम कन्नड आहे. प्रश्नपत्रिका मराठी असेल तर टीईटी देणे अवघड होईल. अल्पसंख्याक कन्नडिगांसाठी उल्लंघन होईल. महाराष्ट्र शासनाद्वारे परीक्षा मराठी आणि कन्नड माध्यमातून घ्यावी. कर्नाटक सरकार मराठी माध्यमातील उमेदवारांसाठी मराठी माध्यमातून टीईटीचे आयोजन करते, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही करावे, अशी मागणी केली आहे. चालू शैक्षणिक वर्षाच्या टीईटी परीक्षेसाठी अर्ज करण्यास काही दिवस शिल्लक आहेत.

## गाझीपूरजवळ बुलडाण्यातील भाविकांच्या बसचा अपघात

■ बुलडाणा

**तिर्थदर्शनासाठी** निघालेल्या बुलडाण्यातील भाविकांच्या बसचा उत्तर प्रदेशातील गाझीपूरजवळ वाराणसी-गोरखपूर मार्गावर भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, ३५ यात्रेकरू जखमी झाले आहेत. त्यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. बसमधील ३८ भाविक चित्रकूट आणि वाराणसी येथे दर्शन घेऊन नेपाळमधील काठमांडूकडे रवाना झाले होते. आज सकाळच्या सुमारास गाझीपूरजवळील नैसरे गावाजवळ हा अपघात घडला. बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने समोरून येणाऱ्या बोलेरो गाडीला वाचवण्याच्या प्रयत्नात बस वेगाने दुभाजकाला धडकली आणि महामार्गावरच उलटली.

# नवाकाळ शब्दकोडे–१५७२



**आडवे शब्द –**

२. धान्योत्पादन करणारा , बळीराजा ४. ठराविक, कोणताही बदल नसलेले ७. कष्टपूर्वक, जेमतेम १०. आसूड ११. नाद, वेडेपणा १२. गृह १४. परिणाम, बक्षीस, प्राप्ती १६. कोरडा, भावनाहीन, मख्ख १८. लांब उडी २०. रूंद काठाचे धोतर २१. दुधाचा पाश्चात्त्य पदार्थ २३. नमुना, वानगी २५. वंदन २७. साळुंकी २८. सुगरण पक्षी २९. शिखर, कळस ३०. हिरमोड ३३. दोस्त ३४. सल्ला ३६. हुलगे ३८. दरवाजा ३९. माजलेला ४०. हलवता येणारे ४१. व्याघ्रगर्जना ४३. लहान मूल यात निजते ४४. ताकाला बेसन लावून व फोडणी देऊन केलेला पदार्थ ४६. सहचारिणी ४७. त्वरित ४८. पुष्कळ ५०. हरवलेले ५२. पंधरवडा ५३. पती ५५. कालखंड, मृत्यू ५६. गंमत ५७. पुष्कळ ५८. सोने ६०. कीटक ६१. खिन्न, दुःखी ६४. सगळे ६५. अमाप, वाजवीहून जास्त ६६. राखण करणारा ७०. सुळका ७४. सुभाषचंद्र बोस यांची उपाधी ७५. साद ७७. सूर्य, मुलींचे एक नाव ८०. वैताग आणणारी बडबड, कटकट अथवा धान्यातील मातीचे कण ८१. डोळे, लोचन ८२. वेल, मुलींचे एक नाव ८४. पांथस्थ ८५. वस्त्र ८६. प्रतिज्ञा ८७. बोकड ८९. षड्रसांपैकी एक रस ९०. घटना ९१. पहिलवान, कुस्तीगीर ९२. हरणाचे पिल्लू ९३. स्तब्धता, नीरवता ९५. खग, पक्षी ९७. नूतन, कोरे, न वापरलेले किंवा आधुनिक ९९. तोंडात कोंबलेला मोठा घास, बोकाणा १०१. पारतंत्र्य १०४. मराठी दहावा महिना १०५. रंक १०६. हनुमान

**उभे शब्द –**

१. वादावादी २. खारीची मोठी जात, आपला राज्य प्राणी ३. विज्ञान ४. खटला, दावा ५. गर्दी ६. भरभराट, उत्कर्ष ८. हळू ९. स्वच्छ ११. पुष्कळ १३. व्याजाने उसने पैसे देणारा १५. एकमेकांना अनुरूप असलेल्या जोडप्याला दिली जाणारी उपमा १७. माफी १८. फुलांचा गुच्छ, वरचेवर पकडा १९. हस्त, हात २२. बळे, मनाविरुद्ध २४. कसदार, पौष्टिक २५. रूढी, चाल, रीत २६. पुष्पदल २९. कुरघोडी ३१. एकूण एक ३२. किरकोळ अंगाचा, शिडशिडीत ३३. प्रहर ३४. डोके ३५. प्रेमात पडलेला, लुब्ध, फिदा ३६. वंश, खानदान ३७. दफन केलेली जागा, कबर ४०. चेहरा ४२. निर्मिती, मांडणी ४५. रास, शीग ४६. कपाळ, ललाट ४७. अवधान देऊन, एकाग्रतेने ४८. उधळपट्टी ४९. त्रुटी, उणीव, चणचण ५१. नुकसान ५२. घरामागचे आवार ५४. शीण ५५. उसाचा आटवलेला रस ५९. दृष्टी ६०. गड, दुर्ग, कोट ६२. पावा, अलगूज ६३. नालस्ती, टीका ६७. ओशाळलेला ६८. ध्येय ६९. विहिरीतून पाणी काढण्याचे साधन, चक्र ७१. मच्छर ७२. कठीण वेळ, समस्या, तिढा ७३. सल्ला, निर्देश ७४. डोळ्यांनी केलेल्या खाणाखुणा ७६. सर्कशीत कसरतीचे खेळ करणारा ७८. भावनांच्या आहारी गेलेला ७९. रागीट ८३. लगेच ८४. वायू ८८. कौशल्य ९०. घटनाप्रधान विनोद असलेले नाटक ९१. स्वच्छंदी, कलंदर ९४. तंतू, वायर ९६. नाराजी ९८. पर्वत, वस्तू १००. कृष्णाची सखी १०२. नवरी १०३. ज्वर १०४. नातू •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७१ चे उत्तर**

**आडवे शब्द :** ३. किमान ५. पाडवा ७. ओघाने ११. चमचेगिरी १२. कवच १३. घटक १४. नाश १५. वादळ १७. जाहीर १८. मौनस्थ २१. विचका २२. हत २३. ससा २५. मीन २६. गिरिजात्मज २७. मद्य २८. किल्ली ३०. मती ३१. सैल ३२. सकस ३४. अवस ३८. बिट्टी ३९. सविता ४०. पाऊलवाट ४२. टवाळ ४३. महाल ४५अ. नत ४६. यमक ४७. कटकट ४८. शिवालय ५०. लीन ५१. मफलर ५२. ताफा ५४. दुर्गम ५७. कोठार ५८. वाढीव ५९. वचपा ६०. गाजावाजा ६१. रवानगी ६४. जोकर ६५. गवा ६८. उशी ६९. हिरा ७१. तडिपार ७३. बारीकसारीक ७५. लायकी ७८. कीस ७९. चाड ८०. कडका ८२. वटणावळ ८३. नाशिक ८५. कोळसा ८७. करडू ८९. कळक ९१. आम ९२. धडा ९३. भाल ९४. चिंतनशील ९५. आंबट ९६. बारकी

**उभे शब्द :** १. कांचन २. अचेतन ३. किरीट ४. नकली ५. पाचपोच ६. वाहवा ७. ओघळ ८. घाट ९. नेकजात १०. बनारस १६. दश १८. मौन १९. स्थगिती २०. गुंजारव २१. विजन २१अ. कामसू २२. हल्ली २४. सासू २५. मी तुझ्या पाऊली जीव वाहिला २८. किलबिल २९. आकस ३०. महालय ३३. सविनय ३४. अटक ३५. सटरफटर ३६. खेळकर ३७. कामकरी ३९अ. तात ४१. वाममार्ग ४४. हाट ४५. हेवा ४८. शिफारस ४९. लडिवाळ ५२. ताठा ५३. भावनाशील ५४. दुपार ५५. मदन ५६. औजार ५७. कोजागरी ६०. गाकर ६२. वाडा ६३. गीत ६४. जोपासना ६६. वाकसळ ६७. खारीक ७०. रायवळ ७२. डिकी ७३. बाड ७४. कडक ७६. कीटक ७७. अवचित ७९. चाक ८१. कारभार ८४. शिक्षा ८५. कोमट ८६. साधर्म्य ८८. डुलकी ८९. कष्ट ९०. खुशी ९१. आब

## हिजबुल्लाचा बंदोबस्त करा! अन्यथा हल्ले

पान १ वरून

इराणशी युद्धबंदीची चर्चा पुढे नेण्याच्या प्रयत्नात असलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना लेबनॉनवरील हल्ले थांबवण्याचे आवाहन केले. मात्र, ट्रम्प यांच्या आवाहनानंतर काही वेळातच इस्त्रायलने लेबनॉनमध्ये किमान दोन ठिकाणी हल्ले केले. प्रत्युत्तरादाखल हिजबुल्लानेही इस्त्रायलच्या पूर्वेकडील शहरावर हल्ला केल्याचा दावा केला.

इस्त्रायल-लेबनॉन सीमेलगत किर्यात शमोना आणि उत्तर इस्त्रायलच्या गॅलिली क्षेत्रातील मिसगाव आम शहरावर रॉकेट हल्ले केल्याचा दावा हिजबुल्लाच्या वतीने करण्यात आला. जोपर्यंत इस्त्रायल आणि अमेरिका आमच्यावरील हल्ले थांबवत नाही, तोपर्यंत आम्हीदेखील हल्ले करत राहू, अशी धमकी हिजबुल्लाने दिली. लेबनॉनला युद्धबंदीच्या करारातून दूर ठेवण्याच्या इस्त्रायलच्या भूमिकेवर रशियाने आज जोरदार टीका केली. रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लाव्हरोव्ह यांनी इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांशी फोनवरून संवाद साधला. त्यांनी सांगितले की, युद्धबंदीच्या कक्षेत कोणत्याही परिस्थितीत लेबनॉनचा समावेश झाला पाहिजे. तरच खऱ्याअर्थी प्रादेशिक शांतता निर्माण होईल.

दुसरीकडे इस्लामाबादमध्ये आजपासून इराण आणि अमेरिकेच्या प्रतिनिधींमध्ये युद्धबंदीची चर्चा सुरू होणार होती. परंतु या चर्चेचे नेमके काय झाले हे कळू शकले नाही. अमेरिकेच्या वतीने इस्लामाबादमधील बैठकीसाठी उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांच्यासोबत स्टीव्ह व्हिटकॉफ आणि जेरेड कुशनर हे पाकिस्तानला जातील, असे काल जाहीर करण्यात आले होते. प्रत्यक्षात आज इराण किंवा अमेरिकेकडून कोणीही प्रतिनिधी चर्चेसाठी पाकिस्तानला गेलेच नाहीत.

## राज्यातील बड्या नेत्याची व्हीएसआर विमान कंपनीच्या मालकाशी भेट

पान १ वरून

त्या नेत्याशी हस्तांदोलन करतो. त्या नेत्याच्या पीएच्या हातात काही कागद देतो. विशेष म्हणजे अजितदादांच्या अपघातातील मृत पायलट कपूरचा मुलगा त्या नेत्याच्या विमानाचा पायलट असतो. हे सगळं आश्चर्यचकित करणारे नाही का? माझे आजही सांगणे आहे की, अजितदादा अपघात प्रकरण हलक्यात घेऊ नका. व्ही. के. सिंगला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करू नका. त्यांच्या विमानाने प्रवास करणे टाळा. स्वतःची काळजी घ्या.. व्हीएसआरवर एवढा विश्वास ठेवू नका. नाहीतर हे सगळे काही खूप अडचणीचे ठरू शकते.

रोहित पवार यांनी पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनासोबत आधी केवळ विमानसेवेपुरता मर्यादित असलेला व्ही. के. सिंग ज्याप्रकारे आंध्र प्रदेशमध्ये तेथील नेत्यांशी आर्थिक संबंध असल्याने तेथील मोठ्या प्रकल्पांच्या कामांसाठी मध्यस्थ/दलाल म्हणून काम करत होता. त्याचप्रमाणे आज तो महाराष्ट्रात सुद्धा मोठ्या प्रकल्पांच्या कामासाठी मध्यस्थ/दलाल म्हणून भूमिका बजावत असल्याची नवी माहिती समोर येत आहे.

ही माहिती सत्य असेल तर महाराष्ट्र सरकार अजून किती खालच्या पातळीला जाणार आहे? असा प्रश्न पडतो. इतके सर्वकाही असताना सत्तेत असलेला पक्ष शांत बसून एएआयबीच्या अहवालाची प्रतीक्षा करतो आहे. याचे अधिक दुःख वाटते. याप्रकरणी सीबीआयकडून अधिक सखोल चौकशी होईल, ही अपेक्षा.

## भारताने जागतिक हवामान परिषदेचे यजमानपद सोडले

पान १ वरून

परिषद आयोजित न करण्याचा निर्णय घेतल्यामुळे २०१५ च्या पॅरिस कराराबाबत भारत किती गंभीर आहे, यावर प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच, कार्बन कमी करण्यासाठी कडक पावले उचलण्याची तयारी आहे का, याबाबतही शंका निर्माण झाली आहे. या परिषदेदरम्यान हवामान बदलावरचा महत्त्वाचा अहवाल येण्याची शक्यता आहे. भारताने ही परिषद घेतली असती, तर देशावर अधिक कठोर हवामान उपाययोजना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव आला असता. हे सरकार टाळत आहे.

सरकारी सूत्रांचे म्हणणे आहे की, हा निर्णय धोरणात्मक असू शकतो. ३३ व्या कॉन्फरन्स ऑफ पार्टीज परिषद आयोजित करणे हे मोठे व्यवस्थापन आणि राजनैतिक आव्हान असते, ज्यात जवळपास २०० देश आणि हजारो प्रतिनिधी सहभागी होतात. त्याच काळात इतर महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमुळे प्राधान्यक्रम बदलले असण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. तसेच, कोळशावरील अवलंबित्व आणि हवामान उद्दिष्टांबाबत वाढत्या आंतरराष्ट्रीय तपासणीपासून दूर राहण्याचाही प्रयत्न असू शकतो. विशेष म्हणजे, भारताने या परिषदेसाठी काही ठोस पावले उचलली होती. २०२५ मध्ये कॉन्फरन्स ऑफ पार्टीजसाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात आला होता, सरकारचे म्हणणे आहे की, जागतिक हवामान प्रक्रियांबाबत त्यांची बांधिलकी कायम आहे. मात्र टीकाकारांच्या मते अशा महत्त्वाच्या व्यासपीठावरून मागे हटणे हे भारताच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते, विशेषतः अशावेळी जेव्हा जागतिक हवामान नेतृत्वासाठी स्पर्धा वाढत आहे.


क्र. सदस्य (प्र.)/टे-३/टेनन्सी/रिव्ही./सिंधुदुर्ग/एल-१/२०२३
दिनांकः-०८/०४/२०२६

प्रति,
**श्रीम. उषा राजाराम अरोसकर** -----अर्जदार
रा.मु.पो. परबवाडा,ता.वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग

**विरूद्ध**

२) श्री. सुरेश हरि कामत
रा. २७७,अंबरनाथ(पूर्व), जि. ठाणे ----सामनेवाले
७) श्रीम. अरूणा अरविंद कामत
रा. सुश्राम बिल्डींग,रूम नं. ३, बोरीवली (प.), मुंबई
८) श्री. राजेंद्र मधुसुदन कामत
रा.आडारी,उभादांडा,ता.वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग
१०) श्री. रूपश्री चंद्रकांत कोटनीस
रा.गोविंद नगर, जवाहर नगर, बिल्डींग नं. ५, तळ मजला, बोरिवली (प.), मुंबई-४०००६६

**विषयः- सुनावणी नोटीसबाबत.**

वरील नाव धारण करणारा, अर्जदार यांच्या उपरनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी **दिनांक १४/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** न्यायाधिकरणापुढे खालील पत्त्यावर करण्याचे निश्चित केले आहे, याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा विधिज्ञा मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

**सही/-**
**(वर्षाराणी भोसले)**
**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**

**सुनावणीचे ठिकाणः-**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-४०००३२**


## नाशिक लैंगिक अत्याचार भाजपाचे कंपनीसमोर आंदोलन

पान १ वरून

ताब्यात घेतले. त्यांनी काही काळ ठिय्या आंदोलनही क्ले. दरम्यान, या प्रकरणातील ६ आरोपींना आज न्यायलयात हजर करण्यात आले. अश्वीनी चेनानी यांना पोलीस कोठडी सुनावली आहे तर उर्वरित पाच जणांना १३ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

आंदोलनावेळी भाजपाचे शहराध्यक्ष म्हणाले की, या प्रख्यात आयटी कंपनीमधून धर्मांतर आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटना उघडकीस आल्या आहेत. कंपनीतील एका महिलेने यापूर्वी ईमेलद्वारे या प्रकारांची माहिती दिली होती. जर पुण्यातील मुख्य कार्यालयाने याची वेळेत दखल घेतली असती, तर या घटनांना आळा बसला असता. मात्र, व्यवस्थापनाने याकडे दुर्लक्ष केले.

या प्रकरणाचा पर्दाफाश करण्यासाठी पोलिसांनी गुप्त कारवाई केली होती. महिला वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सात महिला पोलिसांचे विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने वेषांतर करून कंपनीत प्रवेश केला. बैठकीदरम्यान आरोपींचे आक्षेपार्ह वर्तन प्रत्यक्ष आढळल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत त्यांना अटक केली. तपासादरम्यान ४० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली आणि डिजिटल पुरावेही गोळा केले. या प्रकरणात महिलांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, मानसिक छळ आणि धर्मांतरणाचा प्रयत्न झाल्याचे आरोप आहेत. पीडित महिलांनी दिलेल्या तक्रारीनुसार, नोकरीच्या नावाखाली सुरुवातीपासूनच दबाव टाकला जात होता. माझ्यामुळे तुला नोकरी मिळाली असे सांगत त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण केला जात होता. काही महिलांना धार्मिक प्रथा बदलण्यासाठी भाग पाडण्यात आले आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात हस्तक्षेप केल्याचेही उघड झाले आहे.

या संपूर्ण प्रकरणात आतापर्यंत ९ गुन्हे दाखल झाले असून ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यात कंपनीच्या एचआर अश्विनी चेनानी हिचाही समावेश आहे. तिला नाशिक पोलिसांनी पुण्यातून अटक केली. पीडित महिलांनी वारंवार तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

## अशोक खरातच्या पत्नीच्या अटकपूर्व जामिनावर १६ एप्रिलला सुनावणी

पान १ वरून

सादर करण्यात आला आहे. तपासादरम्यान विविध डिजिटल उपकरणांमधून मोठ्या प्रमाणात माहिती मिळाली आहे. तीन पेन ड्राईव्हमध्ये ३२ जीबी क्षमतेचा डेटा, त्यात १९ स्वतंत्र फोल्डर, तसेच ६४ जीबी क्षमतेचा ओटीजी पेन ड्राईव्ह आणि एक लॅपटॉप यांची तपासणी करण्यात आली आहे. या सर्व उपकरणांमधील माहिती सायबर आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांकडून बारकाईने तपासली जात आहे. या सर्व मिळून १६० जीबीपेक्षा अधिक डेटा तपास पथकाच्या हाती लागला आहे. या डिजिटल पुराव्यांमध्ये नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत घडलेल्या घटनांचा तपशील आहे. विशेषतः कॅनडा कॉर्नर येथील कार्यालयातून जप्त केलेल्या माहितीमुळे अनेक बाबी उघड होत आहेत. तपास यंत्रणांनी प्रत्येक पुराव्याला वेगळे कोडवर्ड दिले असून 'ए', 'बी' आणि 'सी' अशा स्वरूपात त्यांचे वर्गीकरण केले आहे. त्यापैकी 'ए' या कोडमध्ये अत्यंत गंभीर स्वरूपाचे संकेत असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर हिलाही शिर्डी पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. प्रतिभा चाकणकर हिच्या नावे दोन तर तिच्या मुलांच्या नावे दोन बँक खाती असून, या चार खात्यांवर २ कोटी ४० लाख रुपयांचा व्यवहार झाल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांच्या हाती लागली आहे.


**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. ०६/२०२५-२६**

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक-३ (पश्चिम उपनगरे) यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकूण ७ कामाकरीता बी-१ (Percantage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in,** उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | १३/०४/२०२६ सकाळी १०.३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | २०/०४/२०२६ दुपारी ३.०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | २१/०४/२०२६ दुपारी ३.०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | २२/०४/२०२६ सकाळी १०.३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टीप :** १. विस्तृत ई-निविदा सूचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
**टीप :** २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प).**
**मुं.झो. सु.मंडळ, मुंबई**

CPRO/A/277
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial


## 'गगनयान'चा महत्त्वाचा टप्पा पार दुसरी एअर ड्रॉप चाचणी यशस्वी

पान १ वरून

मॉड्यूलचा वेग कमी करून त्याला सुरक्षितपणे समुद्रात किंवा ठरलेल्या ठिकाणी उतरवते. या टेस्टमध्ये डमी क्रू मॉड्यूल भारतीय वायुसेनेच्या विमान किंवा हेलिकॉप्टरमधून उंचीवरून सोडले जाते. यावेळी पॅराशूट योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने उघडते का, हे तपासले जाते. इंटिग्रेटेड एअर ड्रॉप टेस्टच्या यशामुळे इस्त्रोची ही प्रणाली विश्वासार्ह असल्याचे सिद्ध झाले आहे. सरकारने गगनयान कार्यक्रमासाठी सुमारे १०,००० कोटी रुपये मंजूर केले आहेत. ही मोहीम अंतिम टप्प्यात असून पहिले मानवयुक्त उड्डाण २०२७ च्या पहिल्या तिमाहीत होण्याची शक्यता आहे.

इस्त्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सांगितले की, मानवरहित गगनयान मिशनची तयारी सुरळीत सुरू आहे. अंतिम मानवयुक्त उड्डाणापूर्वी तीन मानवरहित मोहिमा पार पडतील. गगनयान हे भारताचे पहिले मानव अंतराळ उड्डाण कार्यक्रम आहे. या मोहिमेत ३ अंतराळवीरांना सुमारे ४०० किमी उंचीवर पाठवले जाईल. ते सुमारे ३ दिवस अंतराळात राहतील. नंतर त्यांना सुरक्षितपणे पृथ्वीवर परत आणले जाईल. ही मोहीम टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाईल. आधी मानवरहित चाचण्या घेतल्या जात आहेत. त्या यशस्वी झाल्यानंतर मानवयुक्त मोहीम राबवली जाईल. गगनयान यशस्वी झाल्यास भारत मानव अंतराळ उड्डाण करणाऱ्या देशांच्या यादीत सामील होईल.

सध्या ही क्षमता अमेरिका, रशिया आणि चीन यांच्याकडे आहे. या मोहिमेसाठी भारतीय वायुसेनेतील चार पायलटांची निवड करण्यात आली आहे. त्यात प्रशांत बालकृष्णन नायर, अजित कृष्णन, अंगद प्रताप, शुभांशु शुक्ला यांचा समावेश आहे. या सर्व अंतराळवीरांनी विशेष प्रशिक्षण घेतलेले आहे.


**SBI-SG**
One Stop Solution For All Investments

**SBI-SG GLOBAL SECURITIES SERVICES PVT. LTD.**
B-Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) Building, SVP Road, Santacruz (W), Mumbai – 400054, Maharashtra, India

**TENDER NOTICE**

Chief Administrator & Financial Officer, SBI-SG Global Securities Services PVT. LTD., B-Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) Building, SVP Road, Santacruz (W), Mumbai – 400054, Maharashtra, India, invites bids from eligible bidders for the below deliverables as per the RFP scope and terms.

| Solutions / Services Expected | RFP Number |
|---|---|
| Internal Audit of Custody Operations | SBISG-GSS/2025-26/16 |

The complete set of bidding documents can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in**/statutory/ "TENDER" section. Check for schedule of submission and details in the respective RFPs

**Sd/-**
**(Amitav Kar)**
**Chief Administrator & Financial Officer**



**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**''निविदा''**

महावितरणच्या ठाणे -२ विभाग कार्यालया अंतर्गत HT Overhead Lines/HT underground cables of HT Overhead Lines, LT Underground Cables of HT Overhead Lines, DTC विद्युत वाहिनी व रोहित्र दुरुस्तीसाठी १ वर्ष कालावधीसाठी खालील निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र | कामाचा तपशील | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | EE/THN-2/E-Tender/HTPM T-1/2026-27 | उच्चदाब वाहिनी देखभाल व दुरुस्ती | ९० लाख |
| २ | EE/THN-2/E-Tender/LTPM T-02/ 2026-27 | लघुदाब वाहिनी देखभाल व दुरुस्ती | ६० लाख |
| ३ | EE/THN-2/E-Tender/ LTPM T-03/ 2026-27 | DTC वाहिनी देखभाल व दुरुस्ती | ४० लाख |

सदर निविदा दि. १०.०४.२०२६ ते १७.०४.२०२६ या कालावधीत Online प्रकारे etender.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील. निविदा भरण्याची अंतिम दि. १७.०४.२०२६ (११:०० वाजेपर्यंत) राहील. निविदा भरताना निविदा शुल्क व अनामत रक्कम भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे. सदर निविदा दिनांक- १७.०४.२०२६ (१६:०० वाजता) उघडण्यात येतील.

**कार्यकारी अभियंता, ठाणे -२ विभाग**

नवा काळ
• मुंबई । शनिवार ११ एप्रिल, २०२६ • पान -८

## आरजी कर पीडितेच्या आईला भाजपाने उमेदवारी दिली



**कोलकाता -** कोलकातामधील आरजी कर रुग्णालयात बलात्कार करून हत्या करण्यात आलेल्या महिला डॉक्टरच्या आई रत्ना देबनाथ यांना पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत भाजपाने बराकपूर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

रत्ना देबनाथ यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दारवल केला. याप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी आणि त्रिपुराचे माजी मुरव्यमंत्री विप्लब देव त्यांच्यासोबत होते. पीडितेला न्याय देण्यास राज्यातील तृणमूल काँग्रेसचे सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे, असा आरोप याप्रसंगी स्मृती इराणी यांनी केला.

## सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना २०२७ पर्यंत स्थगिती

**केंद्र सरकारचे राज्यांना निर्देश**

■ नवी दिल्ली

**सरकारी** अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांवर ३१ मार्च २०२७ पर्यंत स्थगिती देण्याचे निर्देश केंद्र सरकारकडून देण्यात आले आहेत. केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांनी देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना यासंदर्भात पत्र पाठवले आहे. या पत्रात नमूद केले आहे की, देशात जनगणना २०२७ ची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असून, नागरिकांना 'स्वयं-गणने'ची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात घरनोंदणी व घरांची गणना केली जाणार आहे. एप्रिल ते सप्टेंबरदरम्यान राज्य सरकार निश्चित करेल त्या ३० दिवसांच्या कालावधीत हा टप्पा पूर्ण केला जाईल. दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष लोकसंख्येची गणना फेब्रुवारीमध्ये करण्यात येणार आहे.

राज्य, जिल्हा, तहसील आणि प्रगणक गट स्तरावर जनगणना अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू असून, त्यांच्या प्रशिक्षणालाही सुरुवात झाली. जनगणना कायदा १९४८ आणि जनगणना नियम १९९० अंतर्गत या अधिकाऱ्यांवर वैधानिक जबाबदारी असते. म्हणूनच, एकदा नियुक्ती झालेल्या अधिकाऱ्यांना जनगणना प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांच्या पदावरून हटवू नये, अशी स्पष्ट भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे.

## व्हीआयपी दर्शनावर आक्षेप याचिका 'लालबागचा राजा'ची फेटाळण्याची मागणी

■ मुंबई

**लालबागचा** राजा गणेशोत्सव मंडळाविरोधात गणेशोत्सवादरम्यान 'दर्शन' घेण्यासाठी येणाऱ्या सामान्य भक्तांशी झालेल्या कथित गैरवर्तनाबाबत तक्रार याचिका दाखल करण्यात आली. ती फेटाळण्याची विनंती मंडळाने मानवाधिकार आयोगाकडे केली.

मध्य मुंबईतील हे प्रसिद्ध गणेश मंडळ दरवर्षी १० दिवस चालणाऱ्या उत्सवात चित्रपट अभिनेते आणि राजकारण्यांसह लाखो भक्तांना आकर्षित करते. शहरातील दोन वकिलांनी, आशिष राय आणि पंकज मिश्रा यांनी २०२५ मध्ये आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. त्यामध्ये व्हीआयपी लोकांना दिल्या जाणाऱ्या विशेष वागणुकीबाबत



आक्षेप नोंदवला होता. मंडळाने म्हटले की ही तक्रार फेटाळली जावी, अशी विनंती केली. मंडळाने युक्तिवाद केला की, ही तक्रार ऑगस्ट २०२५ मध्ये दाखल करण्यात आली असली तरी ती २०२३ आणि २०२४ मधील तक्रारींवर आधारित आहे. त्यामुळे मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ नुसार विलंबामुळे ती कायदेशिरदृष्ट्या ग्राह्य धरता येत नाही. व्हीआयपी आणि मान्यवरांसाठी सुरक्षा व्यवस्था पोलीस आणि महापालिका ठरवतात. कोणत्याही भक्ताने वैयक्तिकरित्या गैरवर्तनाला आरोपांना दुजोरा दिलेला नाही. भक्तांशी गैरवर्तन किंवा हल्ल्यांच्या आरोपांबाबत पोलिसांनी सांगितले की ९ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. याबाबत सुनावणी ७ जुलै रोजी होणार आहे.

## सुरतचे कापड व्यावसायिक कामगारांना परत बोलावणार

■ सुरत

युध्दामुळे आणि इंधन टंचाईमुळे ठप्प झालेला सुरतचा कापड उद्योग पुन्हा सुरू करण्यासाठी सुरतच्या कापड व्यावसायिकांनी पुढाकार घेतला. आपापल्या घरी गेलेल्या कामगारांना पुन्हा माघारी आणण्यासाठी आर्थिक मदत करण्याची तसेच गरज वाटल्यास खासगी वाहनांनी त्यांना घेऊन येण्याची तयारी केली.

इराण आणि अमेरिकेमध्ये युध्दविरामाची चर्चा सुरू झाल्यापासून कच्च्या तेलाचे दर खाली आले. स्वयंपाकाच्या गॅसची उपलब्धताही वाढत आहे.त्यामुळे कापड उद्योगाचा कणा मानल्या जाणाऱ्या स्थलांतरित कामगारांना त्यांच्या जिल्ह्यांमधून पुन्हा सुरतला आणण्यात येणार आहे. या कामगारांना सर्व प्रकारची मदत केली जाणार आहे. फेडरेशन ऑफ गुजरात विव्हर्स वेल्फेअर असोसिएशन आणि सदर्न गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या दोन बड्या संघटनांनी संयुक्तपणे ही घोषणा केली आहे. मागील काही दिवसांत युध्दस्थितीमुळे कच्च्या तेलाचे भाव प्रचंड वाढल्याने कापडाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली होती.

## पालकमंत्री होऊन २५ दिवस झाले मुश्रीफांचा नंदुरबारचा दौराच नाही

■ नंदुरबार

**नंदुरबार** जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्ती होऊन २५ दिवस उलटूनही हसन मुश्रीफ यांनी अद्याप नंदुरबार जिल्ह्याचा दौरा केलेला नाही. त्यामुळे जिल्हा विकासाला चालना कधी मिळणार, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सदनिका प्रकरणात कारवाई झाल्यानंतर मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद जवळपास दोन महिने रिक्त होते. त्यानंतर हसन मुश्रीफ यांची पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र नियुक्तीनंतरही ते अद्याप जिल्ह्यात न आल्याने प्रशासन आणि नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. आता मुश्रीफ नंदुरबार दौर्यावर कधी येणार आणि जिल्हा विकासाला गती कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बुरा नही हू बस आपको अच्छा नही लगता! कामराच्या टी-शर्टची चर्चा

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गीत गायल्यानंतर दाखल झालेल्या हक्कभंग प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर कॉमेडियन कुणाल कामरा विधीमंडळाच्या हक्कभंग समितीसमोर उपस्थित होते. यावेळी कुणाल कामरा यांनी, बुरा नही हू, बस आपको अच्छा नही लगता असा मजकूर असलेला टी-शर्ट घातला होता. त्याच्या या टी-शर्टची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र, त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सादर केलेल्या विडंबनात्मक गीताच्या प्रकरणात माफी मागण्यास नकार दिल्याने वाद अधिकच वाढला आहे.

या सुनावणीत कामराने सांगितले की, संबंधित गीत हे त्यांच्या व्यवसायाचा भाग आहे. मी कोणतीही चूक केलेली नाही. विशेषाधिकार समितीने

### माफीस नकार कायम

सुनावणीदरम्यान कामराला त्यांच्या वक्तव्याबाबत पश्चात्ताप आहे का, तसेच माफी मागणार का, असे प्रश्न विचारले. मात्र, त्यांनी आपल्या भूमिकेवर ठाम राहत माफी मागण्यास नकार कायम ठेवला. या प्रकरणी तो पुढील उत्तर वकिलामार्फत देणार असल्याचेही त्याने सांगितले.

## स्पाइसजेटमध्ये २० टक्के कर्मचाऱ्यांची कपात होणार

■ नवी दिल्ली

**देशातील** कमी किमतीची विमान सेवा देणारी स्पाइसजेट आर्थिक अडचणीत सापडली असून, कंपनीने २० टक्के कर्मचाऱ्यांची कपात करण्याचा निर्णय घेतला. यामुळे ५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना विनावेतन रजेवर पाठवले जाण्याची शक्यता आहे. कंपनीकडे सध्या ६,८०० कर्मचारी असले तरी ताफ्यात १३ स्वतःची विमाने उरली आहेत. यात १० बोइंग आणि ३ क्यू-४०० विमानांचा समावेश आहे. १४ विमाने 'वेट-लीज'वर (कर्मचाऱ्यांसह भाड्याने) चालवली जात आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना जानेवारीपासून पगार मिळालेला नाही, तर इतर कर्मचाऱ्यांचे वेतनही २-३ महिने विलंबाने दिले जात आहे. कंपनीवर जीएसटी, टीडीएस आणि पीएफचे १०० कोटी रुपयांहून अधिक थकबाकी आहे.

## रिश्ते ही मायने रखते है! पैसा सत्ता यापेक्षा कुटुंब महत्त्वाचे



■ पंढरपूर

**बारामती** पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. रिश्ते ही मायने रखते हैं, असे म्हणत त्यांनी पैसा आणि सत्तेपेक्षा नातेसंबंध अधिक महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. यावेळी त्यांनी अजित पवार गटाकडून बोलावणे आल्यास प्रचारासाठी जाण्याचा विचार करेन, असे सूचक भाष्यही केले.

खासदार सुप्रिया सुळे पंढरपूर येथे विठ्ठल मंदिर दर्शनासाठी आल्या होत्या. दर्शनानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. बारामती

त्या पुढे म्हणाल्या, अजित पवार गटाकडून बोलावणे आल्यास प्रचारासाठी जाण्याचा विचार करू शकते.

### बारामती निवडणुकीवर सुळेंचे विधान

पोटनिवडणुकीबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, ही निवडणूक बिनविरोध का झाली नाही, याचे उत्तर अजित पवार गटाकडूनच मिळेल. कारण यासाठीचे व्यवस्थापन तेच पाहत होते. मी दिवसभर बारामतीत नव्हते, त्यामुळे नेमके काय घडले याची माहिती नाही.

मात्र या पोटनिवडणुकीत माझी भूमिका मतदान करण्यापुरतीच आहे. राजकारणात पैसा आणि सत्ता महत्त्वाची असली, तरी कुटुंब आणि नातेसंबंध अधिक महत्त्वाचे असतात त्यामुळेच मी नेहमी सांगते, 'रिश्ते मायने रखते है'. त्यामुळे संपूर्ण कुटुंब सुनेत्रा वहिनींच्या पाठीशी आहे.

## तुकाराम मुंढे यांची आपत्ती व्यवस्थापनमधील नियुक्ती रद्द



■ मुंबई

**प्रशासनातील** कडक शिस्तीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची आपत्ती व्यवस्थापन,मदत आणि पुनर्वसन विभागाच्या सचिवपदी झालेली नियुक्ती रद्द करण्यात आली आहे. आपल्या मातोश्रींचे निधन झाल्यामुळे ते सूत्रे स्वीकारू शकले नव्हते. परंतु त्यांच्या जागी पुन्हा विनिता वैद सिंघल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामागे राजकीय हस्तक्षेप आणि कुंभमेळ्याच्या निधीवरून दोन मंत्र्यांचा विरोध असल्याची चर्चा आहे.

२१ वर्षांच्या कारकिर्दीत २५ वेळा बदली झालेले सनदी अधिकारी तुकाराम मुंढे हे सध्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव आहेत. त्यांची गेल्या ३१ मार्च रोजी आपत्ती व्यवस्थापन सचिव बदली करण्यात आली होती. बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या यादीत त्यांचे नाव होते. परंतु त्याचवेळी त्यांच्या मातोश्रींचे निधन झाल्याने ते काही दिवस सुट्टीवर होते. ते सुट्टीवरून परतले.पण ६ एप्रिल रोजी त्यांची ही बदली रद्द करून पुन्हा पहिल्याच दिव्यांग कल्याण विभागात नियुक्ती केल्याचे आदेश काढण्यात आले.

## गोगावले यांच्या कन्या सरपंचपदाच्या रिंगणात

**महाड-** शिंदे गटाचे नेते व मंत्री भरत गोगावले यांच्या कन्या वैशाली मालुसरेही सरपंचपदाच्या रिंगणात उतरल्या आहेत. त्यांनी महाड तालुक्यातील किए ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरला असून, त्यांच्या बिनविरोध निवडीची दाट शक्यता आहे. किए ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच नंदा गोगावले यांनी राजीनामा दिल्यानंतर ही पोटनिवडणूक होणार आहे.




## एमबीबीएस विद्यार्थ्यांकडून साडेचार वर्षांचेच शुल्क घ्या आयुर्विज्ञान आयोगाचे महाविद्यालयांना निर्देश

■ मुंबई

**राष्ट्रीय** आयुर्विज्ञान आयोगाने सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी केवळ ४.५ वर्षांचेच शैक्षणिक शुल्क आकारण्याचे सक्त निर्देश दिले. एक वर्षांच्या इंटर्नशिपचे शुल्क आकारू नये असे स्पष्ट करण्यात आल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कडक कारवाईचा इश-ारा देण्यात आला. एमबीबीएस हा साडेचार वर्षांचा म्हणजे ५४ महिन्यांचा शैक्षणिक अभ्यासक्रम आहे.याव्यतिरिक्त १ वर्षाची अनिवार्य अशी 'इंटर्नशिप' म्हणजे आंतरवासिता कालावधी असतो. मात्र हे एक वर्ष शैक्षणिक भाग नसल्याने त्याचे शुल्क आकारता येणार नाही. तरीही काही महाविद्यालये ५ किंवा ५.५ वर्षांची फी आकारतात. यावर आयोगाने हरकत घेत हे निर्देश दिले आहेत. हा निर्णय खाजगी आणि सरकारी सर्वच वैद्यकीय महाविद्यालयांना लागू आहे.

## रशियाचा भारताला प्रस्ताव गॅसवर ४० टक्के सवलत


■ मॉस्को

**रशियाने** भारतासह आशियाई देशांना एलएनजी म्हणजेच द्रव नैसर्गिक वायू खरेदीवर ४० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचा प्रस्ताव दिला आहे. भारत यापूर्वी रशियाकडून तेल व वायू विकत घेत होता. मात्र अमेरिकेने दबाव आणून ही खरेदी बंद करायला लावली. आता रशियाने स्वस्त तेलाचा प्रस्ताव दिला आहे त्याला भारत कसा प्रतिसाद देते याकडे लक्ष आहे. ब्लूमबर्गने म्हटले की, जागतिक नैसर्गिक वायू पुरवठा संकटाचा फायदा घेण्यासाठीच रशियाने हा स्वस्त दराचा प्रस्ताव आणला आहे. ऊर्जेची तीव्र टंचाई असलेल्या दक्षिण आशियाला अमेरिकेने निर्बंध घातलेल्या प्रकल्पांमधून वायू खरेदी करण्यासाठी ही मोठी सूट दिली आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

MEMORIAL SERVICE

"Honor your father and your mother, that your days may be long in the land that the Lord your God is giving you." – Exodus 20:12



Late. Mr. David Genuji Waghmare.

Retired employee of Central Railway - Parel Workshop, Member of The Salvation Army Church - Matunga Corps, and a Devoted father.

Date of Birth : 10-10-1936
Date of Death: 03-03-2026

Memorial Service : 11-04-2026

Loved Ones

Usha, Esther, Margaret, Diana, Carol, Mary, Priya and Charles.

